SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१६, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२७ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पावसाने झोडपलं! ढगफुटीसदृश्य कोसळल्याने ८ ते १० गावांचा संपर्क तुटला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, छ. संभाजीनगर :** मराठवाड्यात गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने अखेर जोरदार पुनरागमन केलं आहे. मराठवाड्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावल्यामुळे नदी-नाल्यांना पूर आला असून, पेरणीच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजा सुखावला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांतील नऊ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

**मराठवाड्यातील पावसाचा जिल्हानिहाय सविस्तर आढावा-**

**छत्रपती संभाजीनगर :** ५ मंडळांत जोरदार हजेरी

**मुख्य गावे :** पैठण तालुक्यातील आडूळ मंडळात सर्वाधिक ९८ मिमी पाऊस झाला.

**शहरी भाग :** छत्रपती संभाजीनगर मुख्य शहरात ९१.२ मिमी, कचनेरमध्ये ८० मिमी, तर चिकलठाणा परिसरात ८४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

एकूण जून महिन्याचा विचार केला तर आतापर्यंत विभागात ४७.७ मिमी पाऊस झाला आहे.

**जालना :** ४ महसूल मंडळांमध्ये हाहाकार

**अतिवृष्टीचे क्षेत्र :** जालना शहरासह रामनगर, पाचणवडगाव आणि धनगर पिंपरी या भागांत पावसाने रौद्ररूप धारण केले होते.

**नुकसान :** विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसात घरांची पडझड झाली असून ४ जनावरांचा मृत्यू झाला आहे.

**आकडेवारी :** रामनगरमध्ये ९० मिमी, धनगर पिंपरीत ९१ मिमी तर



जालना शहरात ८७ मिमी पाऊस कोसळला.

**परभणी (जिंतूर) :** ८ ते १० गावांचा संपर्क तुटला!

जिंतूर तालुक्यातील आडगाव शिवारामध्ये ढगफुटीसदृश पाऊस झाला असून शेतातील माती खरडून गेली आहे.

**वाहतूक ठप्प :** ओढ्याला पूर आल्यामुळे आडगाव बाजार ते आडगाव फाटा हा मुख्य रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे.

**संपर्क तुटलेली गावे :** आडगाव बाजार, मोखेड, गडदगव्हाण, सोरजा, टाकळखोपा, भुसकाढोपा, श्रीराम वाडी, चितनेरवाडी, दगडवाडी आणि रायगड तांडा या गावांना पुराच्या पाण्याचा वेढा आहे.

**नांदेड :** हदगावमध्ये ३ तास 'धो-धो'

मृग नक्षत्र कोरडे गेल्यामुळे चिंतेत असलेल्या बळीराजाला या पावसाने मोठा आधार दिला आहे. हदगाव, अर्धापूर, मुखेड आणि कंधार भागात बुधवारी दुपारी मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला; हदगावमध्ये सलग ३ तास मुसळधार पाऊस झाला.

**हिंगोली :** राष्ट्रीय महामार्गावर गुडघाभर पाणी

**वाहतूक विस्कळीत :** हिंगोली शहराजवळील बासंबा परिसरात राष्ट्रीय महामार्गाच्या पुलाचे काम सुरू असल्याने सर्व्हिस रोडवर गुडघाभर पाणी साचले आणि वाहनधारकांची कोंडी झाली.

**तीर्थक्षेत्राची स्थिती :** प्रसिद्ध औंढा नागनाथ मंदिर परिसरातही मुसळधार पावसामुळे पाणीच पाणी झाले होते.

**लातूर :** जिल्ह्यात अजूनही मोठ्या पावसाची प्रतीक्षा असून लातूर जिल्ह्यात केवळ भुरभुर पाऊस असून जळकोटमध्ये सर्वाधिक १३२.९ मिमी पाऊस झाला आहे.

**धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यात तब्बल ८० टक्के तुटीचा पाऊस आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना सावध केले असून, कमीत कमी १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असा सल्ला दिला आहे.

## खासदार निधीतील ५१ पैकी ४१ कामे प्रगतीपथावर
## मागील २ वर्षात ६ कोटी ७२ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजूरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या खासदार विकास निधीतून मागील दोन वर्षात ६ कोटी ७२ लाख रिपयांच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्यात आली असून ५१ कामांपैकी ४१ कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती खासदार प्रतिभा धानोरकर यांच्याकडून देण्यात आली आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत झालेली कामगिरी लक्षवेधक ठरली आहे.

प्राप्त माहितीनुसार २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन आर्थिक वर्षात एकूण १०००.०० लाख (१० कोटी) रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, त्यापैकी तब्बल ६७२.१३ लाख (६.७२ कोटी) रुपयांच्या कामांना त्वरीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

खा. प्रतिभा धानोरकर यांच्या पाठपुराव्यामुळे दोन वर्षात एकूण ५१ कामांना मंजूरी मिळाली असून, त्यापैकी ४१ कामे प्रत्यक्ष जमिनीवर सुरु झाली आहेत. विशेष म्हणजे, यातील १२ कामे पूर्ण झाली असून, २९ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. तसेच सन २०२४-२५ या वर्षात वितरीत झालेला १३५.६९ लाख रुपयांचा निधी विकासकामांवर खर्च करण्यात आला आहे. केवळ वर्ष



२०२५-२६ चा निधी १८ कामांना मंजूरी मिळवून त्यातील ८ कामे प्रगतीपथावर आहे. वास्तविक पाहता, केंद्र सरकारचे ऑनलाईन पोर्टल अनेकदा तांत्रिक कारणांमुळे बंद असते.

ज्यामुळे नवीन कामे प्रस्तावित करतांना आणि प्रशासकीय मंजुरी मिळवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. अशा तांत्रिक अडचणींवर मात करत एकूण मंजूर ५१ कामांपैकी ४१ कामे प्रत्यक्ष सुरु करुन घेणे हे खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या कार्यक्षमतेचे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे जिवंत उदाहरण आहे. चंद्रपूर - वणी - आर्णी लोकसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी कटिबध्द असल्याचे म्हटले आहे.

## लोकमान्यनगर - शास्त्रीनगरच्या वीज प्रश्नावर हणमंत जगदाळे यांचा पाठपुरावा

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.२६, ठाणे :** लोकमान्यनगर व शास्त्रीनगर परिसरातील वाढत्या वीज समस्यांबाबत नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत विभागीय ज्येष्ठ नेते, नगरसेवक तथा सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली दि.२५ जून २०२६ रोजी ठाणे नागरी वीज मंडळ (महावितरण) वागळे विभागाचे अधीक्षक अभियंता लक्ष्मण वत्सला मुरलीधर काकडे यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस प्रभागातील सहकारी नगरसेवक, प्रमुख सहकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.बैठकीत लोकमान्यनगर व शास्त्रीनगर मधील नागरिकांना भेडसावणाऱ्या वारंवार वीज खंडित होणे, स्मार्ट मीटर बसविण्याबाबतची सक्ती, महावितरणची अपुरी यंत्रणा, नियोजनाचा अभाव, तांत्रिक अडचणी, अपुरे मनुष्यबळ आणि बेजबाबदार कामकाज यांसारख्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः गत मे महिन्यात नागरिकांना झालेला त्रास आणि पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्यांवरही बैठकीत गंभीरपणे विचार विनिमय झाला.

सध्या ३०० वॅट क्षमतेच्या अनेक विद्युत वाहिन्यांचा भार एकाच ट्रान्सफॉर्मरवर पडत असल्याने ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त लोड येऊन केबल जळणे, वारंवार बिघाड होणे आणि वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.या पार्श्वभूमीवर वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन लक्ष्मीपार्क परिसरातील इमारती व सोसायट्यांसाठी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर उभारण्याचा, तसेच शास्त्रीनगर विभागासाठी अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याचा निर्णय प्रक्रियेत असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. याशिवाय वीज खांबांवरील गुंतागुंतीचे वायरिंग हटवून १० ते १५ घरांसाठी स्वतंत्र मीटर संच बॉक्स संबंधित सोसायटी व चाळींच्या भिंतीवर बसविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.तसेच सक्षम अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून महावितरणची यंत्रणा अधिक अद्ययावत, कार्यक्षम व तत्पर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आले. यामुळे लोकमान्यनगर व शास्त्रीनगर परिसरातील नागरिकांच्या वीज समस्यांवर लवकरच प्रभावी तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## चैत्यभूमीवर आरक्षण बचाव विराट जनसभा; बीड - मुंबई लॉन्ग मार्चचा समारोप

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२६, नेरूळ (नवी मुंबई) :** आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात आणि आरक्षण बचावाच्या मागणीसाठी बीड ते मुंबई काढण्यात आलेला १७ दिवसांचा पायी लॉन्ग मार्च शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. हा लाँग मार्च पनवेल - नेरूळ मार्गे मुंबईतील चैत्यभूमीकडे रवाना झाला असून, दुपारी चैत्यभूमी येथे समारोप होणार असल्याची माहिती मुख्य संयोजक सिद्धार्थ शिनगारे आणि अजय सरवदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

प्रसिद्धीपत्रकानुसार, सुरुवातीला लॉन्ग मार्चचा समारोप आझाद मैदान येथे करण्याचे नियोजन होते. मात्र, सुट्टीच्या पार्श्वभूमीवर तेथे परवानगी नाकारण्यात आल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. त्यानंतर चैत्यभूमी येथे जाहीर सभा घेण्याचे ठरविण्यात आले, परंतु तेथेही पोलीस




प्रशासनाने परवानगी नाकारल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

आयोजकांनी प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी किंवा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यासाठी परवानगी का आवश्यक असावी? हा निर्णय लॉन्ग मार्च रोखण्याचा प्रयत्न असल्याची भावना संविधानप्रेमी नागरिकांमध्ये निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ अंतर्गत शांततापूर्ण सभा घेण्याचा, विचार मांडण्याचा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार असल्याचे नमूद करत, कायद्यानुसार वाजवी निर्बंध मान्य असले तरी लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनाचा आवाज दाबला जाऊ नये, अशी भूमिका आयोजकांनी मांडली. आयोजकांनी समाजबांधवांना आवाहन करत सांगितले की, २६ जून रोजी दुपारी २ वाजता चैत्यभूमी येथे उपस्थित राहून छत्रपती शाहूजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे तसेच आरक्षण बचाव विराट जनसभामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. शेवटी आयोजकांनी जय भीम! जय संविधान! जय भारत! अशा घोषणांसह संविधानिक हक्कांच्या लढ्याला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

## कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज प्रलंबित?
## न्यायासाठी नागरिकांच्या पोलीस ठाण्याच्या फेऱ्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, कर्जत (रायगड) :** कर्जत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात येणाऱ्या तक्रार अर्जांवर वेळेत निर्णय होत नसल्याची भावना अनेक तक्रारदारांमध्ये व्यक्त होत आहे. किरकोळ वाद, शेजारील भांडणे तसेच अन्य कारणांमुळे नागरिक पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन येत असतात. मात्र काही प्रकरणांमध्ये संबंधित घटना इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याचे सांगून तक्रार नोंदविण्याऐवजी अर्ज स्वीकारला जातो व संबंधित पक्षांना बोलावून घेऊ असे सांगितले जाते, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, अर्ज दिल्यानंतर त्यावरील कार्यवाहीबाबत विचारणा करण्यासाठी पोलीस ठाण्यात गेल्यास संबंधित व्यक्ती हजर राहत नसल्याचे कारण सांगितले जाते. तसेच काहीवेळा आम्हाला एकच कामधंदा आहे का? अशा स्वरूपाची उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याची खंतही नागरिकांनी व्यक्त केली आहे. गरीब व गरजू नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी वारंवार पोलीस ठाण्याच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांच्यामध्ये नाराजीचे वातावरण आहे.

तक्रार अर्ज स्वीकारल्यानंतर त्याची योग्य ती दखल घेऊन वेळेत निर्णय व्हावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक ऑचल दलाल यांनी या प्रकरणाकडे स्वतः लक्ष घालून प्रलंबित तक्रार अर्जांची योग्य ती चौकशी करून संबंधितांना न्याय द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कृषी संशोधन केंद्र, निफाड येथे 'शेतकरी - शास्त्रज्ञ मंच' बैठक संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** कृषी संशोधन केंद्र, निफाड येथे स्थापन करण्यात आलेल्या 'श्रमसाफल्य शेतकरी - शास्त्रज्ञ मंच' ची खरीप हंगाम आढावा बैठक नुकतीच उत्साहात पार पडली. या बैठकीत 'खेत बचाव अभियान' अंतर्गत तज्ज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना खरीप पिकांतील कीड-रोग व्यवस्थापन, जैविक शेती, मृदा आरोग्य आणि उत्पादन खर्च कमी करण्याबाबत सविस्तर व मोलाचे मार्गदर्शन केले. या महत्त्वपूर्ण बैठकीस मंचाचे अध्यक्ष वैकुंठभाऊ पाटील, सचिन पाटील होळकर, रमेश पाटील, अभयशेठ बलदोटा, शामराव मोगल आदी मान्यवर उपस्थित होते.

**तज्ज्ञांकडून तांत्रिक मार्गदर्शन आणि सोपे उपाय :-** एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन : संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी खरीप हंगामातील प्रमुख पिकांवर येणाऱ्या कीड व रोगांचे नियंत्रण कसे करावे, यावर सविस्तर प्रकाश टाकला.

जैविक खतांचा वापर : कवक शास्त्रज्ञ डॉ.पोपट खंडागळे यांनी जिवाणू खते, बीज प्रक्रिया, तसेच मायकोरायझा व ट्रायकोडर्मा यांच्या प्रभावी वापराबद्दल माहिती देऊन पिकांची रोगप्रतिकारक शक्ती कशी वाढवावी, हे सांगितले.

**जमिनीचे आरोग्य व खर्च नियंत्रण :** वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषीविद्या) डॉ. भरत मालुंजकर यांनी नैसर्गिक निविष्ठांचे उत्पादन व वापर, माती परीक्षण, संतुलित खत व्यवस्थापन आणि जमिनीचे आरोग्य जपत उत्पादन खर्च कसा कमी करावा, याबाबत सविस्तर उपाययोजना मांडल्या.

प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष!तांत्रिक सत्रानंतर संशोधन केंद्रातर्फे शेतकऱ्यांसाठी विशेष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्येजीवामृत, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्कतयार करण्याची सोपी पद्धत दाखवण्यात आली.

तसेच शेतातकामगंध व चिकट सापळ्यांचा वापरकसा करावा आणिगादीवाफ्यावर (Broad Bed Furrow) सोयाबीन लागवडकरण्याचे काय फायदे आहेत, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. या प्रात्यक्षिकांना उपस्थित शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व आपल्या शंकांचे तज्ज्ञांकडून निरसन करून घेतले.

या कार्यक्रमास शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचे समन्वयक प्रा. संजय चितोडकर, उपविभागीय कृषी अधिकारी भटू पाटील, तांत्रिक अधिकारी जयंत गायकवाड, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांच्यासह कृषी विभाग व संशोधन केंद्रातील अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्षराज






## तर दुर्लक्ष ठरेल जीवघेणे

लखनौमध्ये आगीत होरपळून १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. दिल्लीत एका हॉटेलला आग लागून २१ जणांना जीव गमवावा लागला. या घटनांच्या पार्श्वभूमीवर कोलकात्यातील रुग्णालय, नाशिक, मुंबईत घडलेल्या घटना स्मरतात. रुग्णालये, हॉटेले, कोचिंग क्लास आदी ठिकाणी आगीच्या दुर्घटना घडल्यावर दोन दिवस धावपळ होते. दोषी कोण, फायर एनओसी होते का, इमारतीला परवानगी किती मजल्यांची होती, ऑडिट कधी झाले असे प्रश्न विचारले जातात. आणि काही दिवसांत सगळेच सारे विसरून जातात

सर्वसाधारणपणे मंगल कार्यालये, हॉटेले, शाळा, रुग्णालये, कोचिंग क्लासेस, चित्रपटगृहे अशा ठिकाणी लोकांची दाटीवाटी असते. अशा ठिकाणी आरोग्य सुविधांपासून अग्निशमन यंत्रणेपर्यंत सारे काही असेल तर अपघात टाळता येतील. पण अपवाद वगळता राज्यभरातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये या यंत्रणा उभ्या करताना दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे चित्र दिसते. त्याचा फटका सर्वसामान्यांना बसतो. नवीन आस्थापना उभारल्यानंतर अग्निशमन यंत्रणा उभी करून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे नियमानुसार बंधनकारक आहे. छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर, नाशिक, सोलापूर यांसह प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाणपत्र घेणाऱ्या आस्थापनांची संख्या तुलनेने फारच कमी असल्याचे दिसून येते.

लखनऊतील दुर्घटनेनंतर आपल्याकडेही याची चर्चा सुरू झाली. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या अग्निशमन विभागाने ३१ आस्थापनांची यादी 'फायर एनओसी'साठी तयार केलीय. त्यात हॉटेले, बार-रेस्टॉरंट, रुग्णालये, पेट्रोल व डिझेल पंप, गॅस एजन्सीज, शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, सरकारी इमारती यांचा समावेश आहे. १५ लाखांहून अधिक लोकसंख्येच्या या शहरात अग्निशमन विभागाकडे केवळ ४४२७ अर्ज 'फायर एनओसी'साठी प्राप्त झाले आहेत. आस्थापनांची अंदाजे संख्या गृहित धरली तर प्राप्त अर्जाच्या आकडेवारीच्या कितीतरी अधिक पटीने अर्ज यायला हवे होते. यंत्रणेने ११३९ अर्जांचा विचार करून अंतिम 'फायर एनओसी' दिली. कागदपत्र व अग्निशमन उपकरणांची पूर्तता न केल्याने उर्वरित आस्थापनांना मंजुरी दिली गेली नाही. हे कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे विशेष. तरीही सगळे व्यवसाय सुरळीत सुरू आहेत. याला प्रशासन, यंत्रणांचे दुर्लक्ष म्हणावे की आणखी काही?

अग्निशमन यंत्रणेकडून परवानगी घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता का केली गेली नाही, अशी विचारणा मात्र होत नाही. अग्निशमन उपकरणे का लावली गेली नाहीत? यंत्रणा तपासणी का करत नाही? एखादी दुर्घटना घडेपर्यंत का वाट पाहिली जाते? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. दुसरीकडे हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी असलेली पद्धत सुटसुटीत व सुलभ आहे का, याचीही तपासणी केली गेली पाहिजे.

नवीन इमारत बांधताना वा व्यवसाय, उद्योग सुरू करताना प्राथमिक परवानगी मागितली जाते. त्यावेळी यंत्रणांनी स्थळपाहणी करून सूचना द्याव्यात आणि अंतिम मंजुरी देण्यापूर्वी त्याची पूर्तता करून घेण्याची सक्ती करावी. काही ठिकाणी तर अग्निशमन विभागात काम करणाऱ्या प्रमुख अधिकाऱ्यांनी शिफारस केलेल्या ठिकाणाहूनच अग्निशमन उपकरणे खरेदी केली तरच 'ना हरकत प्रमाणपत्र' विनासायास मिळण्याची सोय आहे! उपकरणे खरेदी केल्याचा तपशील संबंधित अधिकाऱ्यांना सादर केला की प्रमाणपत्र मिळते. ती उपकरणे लावण्यात आली आहेत का याची पडताळणी मात्र क्वचितच होताना दिसते, असे काहीजण खासगीत सांगतात. क्लिष्ट पद्धती मोडीत काढून सुलभ पद्धतीने मंजुरी देणे, वेळोवेळी तपासणी करून यंत्रणा कार्यान्वित आहे की नाही याची तपासणी करणे, वर्षाला संबंधित आस्थापनेकडून महापालिकेच्या वा संबंधित यंत्रणेच्या अग्निशमन विभागाकडे तपासणी अहवाल सादर करणे याकडे गांभीर्याने लक्ष दिले तर अनेक अडचणी सुलभपणे सुटतील. नाहीतर याकडे होणारे दुर्लक्ष महागात पडू शकते.

– मकरंद कुलकर्णी

# लगबग पेरणीची !



पहिला पाऊस हा निसर्गाचा आनंदोत्सव मानला जातो. उन्हाळ्याच्या कडक झळांनंतर पडणाऱ्या पहिल्या पावसामुळे वातावरण प्रसन्न होते.कोरडी पडलेली धरतीमाय हिरवाईची चाहूल घेते. शेतकऱ्यांच्या मनात नव्या आशा निर्माण होतात. झाडे, पक्षी आणि प्राणीही या पावसाने ताजेतवाने होतात.पहिल्या पावसाचा मातीचा सुगंध सर्वांना मोहित करतो. लहान मुले पावसात भिजण्याचा आनंद घेतात, तर शेतकरी पेरणीच्या तयारीला लागतात.

पावसाळ्याची चाहूल लागताच शेतकऱ्यांच्या जीवनात एक वेगळीच धांदल सुरू होते.गावातील जवळपास सर्व कुटुंब हे हे शेती व्यावसायाशी निगडित असल्यामुळे, गावात पहिल्या पावसानंतर एक वेगळाच उत्साह सर्वांच्या मनात असतो जो तो शेतीविषयक गप्पा करत असतो.उन्हाळाभर शेताची मशागत, नांगरणी, वखरणी आणि इतर पेरणीसाठी पूर्वतयारी पूर्ण केलेली असते.मात्र पहिला समाधानकारक पाऊस पडल्यानंतर पेरणीची खरी लगबग चालू झालेली असते.समजा संध्याकाळच्या प्रहरी पेरणीलायक पाऊस पडला तर त्याच संध्याकाळी शेतकरी लोक घरोघरी जाऊन उद्यासाठी शेतात पेरणीसाठी लागणारे मजूर कामगाराच्या शोधार्थ घरोघरी जातात. ताई, बाई मावशी उद्या कपास लावणी साठी, मिरची लावणी साठी,मका पेरणीसाठी अथवा पेरणीच्या मागे खत फेकण्यासाठी येणार का? म्हणून विचारतात.घरातील चुलीपासून बायकांचा आवाज येतो. नाही दादा मी अमुककडे



**– विनोद जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

होम्हटलंय. म्हणून शेतकरी दुसऱ्या घरी जातो व विचारपूस करतो तर हो म्हणून होकार आला तर शेतकरी दादा खुश होतो.कारण पेरणी करणे ही एक संधी असते.व ती योग्यवेळेतच साधायला हवी. कारण पावसाची ओल खोलवर गेली तर पेरलेलं बियाणं अथवा रोपे झापाट्याने वाढीस लागतात. त्यासाठी शेतकरी सुद्धा तहान भूक विसरून कृषि सेवा केंद्रातून पेरणीस पूरक सर्व बी बियाणे खतं खरेदी करुन ठेवतो.शेतीपूरक व्यवसायाच्या दुकानावर गर्दी होते. त्याचबरोबर सुतार लोहार बंधूकडे शेतकरी आपली शेतीची अवजारे अर्थात औत फाटे दुरुस्त करुन घेतो.

तिफन, कोळपे, वखर, जू त्याचप्रमाणे बैलगाडी ची चाके व्यवस्थित दुरुस्त करुन त्यामध्ये वंगण भरतो जेणेकरून पावसामुळे ते गंजणार नाही याची काळजी घेतो. हल्ली शेतीविषयक बरीच कामे हे ट्रॅक्टरच्या माध्यमातून केली जातात मात्र अजूनही बऱ्याच भागामध्ये पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. सर्व भागामध्ये डांबरी रोड रस्ते नाही त्यामुळे पेरणीसाठी लागणारी बी बियाणे,खते तथा पाईप मशीन व इतर साधने बैलगाडीतूनच गावापासून शेतापर्यंत नेतात. म्हणून त्यासाठी शेतकऱ्यांची ही लगबग असते. कारण पाणी पावसात चिखलामूळे वस्तू पोहचवणे कठीण जातात. त्यासाठी तो घाईगडबडीने व लगबगीने पेरणीचे कामे उरकायला घेतो अन्यथा पाणी पावसात फजिती होते.कारण वीस ते पंचवीस वर्षाअगोदर पांद रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट होती. काळ्या जमिनीचे पांद रस्त्यावर गुडघ्यापर्यंत चिखल साचायचा.त्यातून बिच्चारे बैल आपल्या खांद्यावरून बैलगाडीतून आपल्या धन्यासाठी शेतमाल व शेतीउपयोगी वस्तू वाहून न्यायचा.

पेरणीच्या काळात गावोगावी उत्साहाचे वातावरण असते.भिज पाणी पडून पाण्याची ओल खोलपर्यंत गेल्यावर,अगदी सकाळीसूर्योदयाअगोदर सर्व शेतकरी मजूर व घरातील बायका -पोरं उठतात.गृहिणी दुपारच्या जेवणासाठी चटणी भाकर बनवतात. आणि बाप माणसं बी बियाण्याची पोती बैलगाडीत भरून बैल जुम्पून शेताच्या वाटेला लागतात. त्यांना कर्मचाऱ्यासारखं वेळेचंही भान नसतं.शेतमजूर डोक्यावर पोतडी,किडूक मिडूकाचे बाचके, कोणी टोपले डोक्यावर घेऊन गावाकडून पांदरस्ताने शेतात निघतात.जणू एक रेषेत जणू पंढरी कडे पांडुरंगाच्या भेटीला वारकऱ्यांची वारी निघाली.शेतकऱ्याचं हे कार्य वारकऱ्याच्च्या वारीइतकेचं पवित्र आहे आहे कारण, यां पिकांमध्ये सुद्धा डोलतो. संत सावता माळी यांना कांदा मुळा भाजी मध्ये साक्षात विठोबा दिसतो. अशी ही शेतमजूर माणसांबरोबर आया बहिणी सुद्धा डोक्यावर टोपले,टोपल्यात पालवाट भाकरी हिरवी व भाकरी वर हिरव्या लाल मिरच्याचा ठेचा,आंब्याचं लोणचं, कांदा घेऊन लगबगिने शेताच्या वाटेवर निघते.ही एक आगळी वेगळीच लगबग दिसून येते. अहो एवढचं काय ! एकमेकांसोबत बोलायला वेळ नसतो. कारण पेरणी हा शेतीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो.

शेतात पोहचल्यावर एक श्रद्धेचा भाग म्हणून,शेताच्या बांधावर एक दिवा,अगरबत्ती पेटवतात. दगडावर एक नारळ फोडतात.हळदी कुंकु गुलाल वाहतात आणि गोड म्हणून साखरेचे अथवा खडीसाखरेचे दाणे प्रसाद म्हणून त्या मायमाउलीला अर्पण करतात आणि शेतकरी दादा व घरधनींनबाई जोडीनं हात जोडून प्रार्थना करतात. हे आई! यंदा भरपूर पीक येऊ दे, सर्वांच्या मुखात सुखाचा घास मिळू दे. धन धान्यानं कोठार भरू दे अन बरकत असू दे. अशी समस्त मानवकल्याणार्थ प्रार्थना करतात.व पेरणीला सुरुवात करतात जी बीयाणे तिफणीतून पेरण्यालायक आहे ते तिफनीतून पेरतात तर काही लावणीची पिके जशी की, मिरची ऊस,तांदूळ, फुलझाडे ही सरी सरीने लावतात अर्थात लावणी करतात.शेतातील वातावरण अतिशय प्रसन्न वाटते.काळ्याभोर जमिनीवर पांढरे शुभ्र बैलजोडी शोभून दिसते.बैलांच्या गळ्यातील घंटेचा मंजुळ आवाज मन मोहून घेतो.कोकीळ पक्षी पेरते व्हा! पेरते व्हाम्हणून शेतकऱ्याला जणू संबोधित करत असतो.

चिमण्या,कावळे,बगळे, फुलपाखरे आनंदाने स्वैराचार करत या झाडाहून त्या झाडावर फिरत असतात. पाण्याच्या उन्हाळ्यामूळे भटकंतीसाठी गेलेले पक्षी जणू मायदेशी परतात. आजूबाजूच्या शेतात सर्व शेतामध्ये शेतकरी पेरणीच्या कामात गुंतलेला असतो. चहुकडे पक्ष्याच्या आवाजाबरोबर माणसांचा आवाजाने वातावरण गजबजलेले असते. पेरणीकाळात गावे पूर्ण ओस पडतात गावात कुणी चिटपाखरं दिसत नाही.अबाल- वृद्ध शेतात पेरणीची जे काम हाती येईल ते करतात. कारण योग्य वेळी पेरणी झाली तर पीक चांगले येते; उशीर झाल्यास उत्पादनावर परिणाम होऊ शकतो.त्यामुळे शेतकरी हवामानाचा अंदाज,जमिनीतील ओलावा आणि बियाण्यांची उपलब्धता यांचा विचार करून पेरणीचे नियोजन करतो.व त्याची यासाठीच ही पेरणीची लगबग असते.या लगबगीदरम्यान त्याची धांदल उडते. जीवाचे हाल होतात मात्र त्याची तो राजा शेतकरी पर्वा करत नाही, कारण उद्याच्या भविष्यासाठी त्याच्या कुटुंबाच्या गरजा जसं की,मुलांचे शिक्षण, लेकीचे लग्न,सणवार,वृद्ध आई बाबांच्या आरोग्याची काळजी, कर्जाऊ घेतलेल्या रकमेची परतफेड ह्या सर्व आशा त्याने उराशी बाळगलेल्या असतात.एवढा संघर्ष करूनही पिक हाती येईपर्यन्त त्यांना अनेक नैसर्गिक व व्यपारी लोकांच्या मनमानी धोरणामुळे मालाला भाव योग्य भाव न देण्याच्या संकटाना सामना करावा लागतो.

भारतीय कृषिसंस्कृतीत पेरणीला विशेष महत्त्व आहे. ती केवळ शेतीचे काम नसून शेतकऱ्याच्या जीवनातील आशा, परिश्रम आणि निसर्गाशी असलेल्या नात्याचे प्रतीक आहे. पेरणीच्या दिवसांत शेतकरी कुटुंबातील सर्व सदस्य शेतकामात सहभागी होतात. त्यामुळे शेती हा केवळ व्यवसाय न राहता एक सामूहिक जीवनपद्धती बनतो.पेरणी म्हणजे फक्त बी पेरणे नव्हे,ती आशा, कष्ट,संयम, उद्याची स्वप्न मातीत गाडून समस्त प्राणीत्रांच्या कल्याणाबरोबर मानवजातीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पायाभरणी असते.

**माझ्या समस्त शेतकरी बांधवाना समर्पित व शेतीपेरणीसाठी खूप खूप शुभेच्छा...!**

## फाशी

मृत्युदंड झाला जारी
फाशी द्या आता तरी
वाट पाहतेयं ती वेदी
न्याय मिळो कधीतरी

बसूनिया रेड्या वरी
कंटाळली यम स्वारी
अशा या नराधमाला
कसेन्यायचे यमद्वारी

होत आहे जीर्ण जुनी
आसूसली फास दोरी
कुजून जाई कालांतरे
निघून जाई शिरजोरी

पुन्हा नवी अडचण
हातावरी दिली तुरी
वाटेनाशी होत आहे
फाशीची भीती सारी

राष्ट्रपती कार्यालयात
माफीनामा अर्जकरी
निसटू पाहे कसातरी
प्रयास चाले परोपरी

कायद्याच्या पळवाटा
अडचण भलती खरी
नरा धम मुक्त फिरतो
निर्भयहोई अत्याचारी

फाशी शिक्षा अवघड
शिक्षा देता कुणा तरी
कारवाई अधिक कटू
फाशी मंजुरी हो जरी

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## वाचक पत्र



### लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापून बालविवाह थांबतील का ?

राज्यासह देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करत असताना बालविवाहांमध्ये मात्र वाढ होताना दिसत आहे. सरकारी माहितीनुसार राज्यातील परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ४८ टक्के, बीड जिल्ह्यात ४७.३ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के, सोलापूरमध्ये ४०.३ टक्के विवाह हे मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच होतात. अन्य जिल्ह्यांमध्येही काहीशी अशीच स्थिती आहे. वाढते बालविवाह रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकार राजस्थान सरकारप्रमाणे लग्नपत्रिकेवर मुला-मुलीच्या नावासोबत त्यांची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याच्या विचारात असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

जेणेकरून लग्नाच्या वेळी मुलीचे लग्नाचे अधिकृत वय समजणे सोपे होईल आणि कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करता येईल; मात्र यातून खरेच काही निष्पन्न होईल का ? मुलांना शाळेत प्रवेश घ्यायची घाई झालेले अनेक पालक आजही महाराष्ट्रात जन्माच्या दाखल्यात फेरफार करून मुलाचे वय वाढवून घेतात. शिवाय लग्नपत्रिकेत छापलेली जन्म तारीख खरी आहे याची पडताळणी प्रत्येक विवाहाच्या ठिकाणी जाऊन कोण करणार ? बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे हे ज्ञात असतानाही मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण होण्याआधीच जे पालक तीचा विवाह लावून देतात ते पालक लग्नपत्रिका छापताना खोटी जन्मतारीख छापणार नाहीत का ? लग्न, विवाह आणि मृत्यू यांची सरकारी दरबारी नोंद करणे अनिवार्य असतानाही अनेक विवाहांची सरकार दरबारी नोंद केली जात नाही. त्याबाबत सरकारने कठोर नियम करणे खरेतर गरजेचे आहे. अशावेळी सोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये मुलगी सज्ञान नसताना तिचा विवाह केल्याचे लक्षात आल्यास अशा मुलीच्या आणि मुलाच्या पालकांवर कारवाई करणे सुलभ होईल.

स्त्रीचे वय आणि पुरुषाचे वेतन कधी विचारू नये अशी म्हण महाराष्ट्रात रूढ आहे. कारण दोन्ही बाबतीत उत्तरे खरी मिळतील याची काहीच शाश्वती नाही. मुलीची जन्म तारीख ही तिची खाजगी बाब आहे त्यामुळे ती लग्नपत्रिकेवर उघडपणे मांडणे योग्य वाटत नाही. बालविवाह रोखण्यासाठी व्यापक जनजागृती करणे, बालविवाहाचे तोटे ग्रामीण स्तरावर समजावून सांगणे यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करता येईल. प्रत्येक गावातील ग्रामपंचायात कार्यालय किंवा पोलीस पाटील यांच्याकडे सबळ कागदी पुराव्यांसह विवाहपूर्व नोंदणी बंधनकारक करावी. ज्या गावांत बालविवाह होत असल्याचे लक्षात येईल अशा गावांतील सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. शाळा महाविद्यालयानातूनही विद्यार्थ्यांचे नियमित प्रबोधन करावे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## पावसाची सर

सकाळी सकाळी
एक पावसाची सर
घरी माझ्या आली
दरवाज्यावर थाप मारत
मला उठ म्हणाली
चल म्हणत हात धरून
मला अंगणात घेऊन आली
पहाटेचा गारवा,
त्यात पावसाचा ओलावा
मला बघ म्हणाली
सृष्टीचा नजराणा,
त्यात धुक्यात
लपलेल्या क्षितीजाला
तूच शोध म्हणाली
पावसाच्या धारा,
त्यात पडणाऱ्या गारा
मला वेच म्हणाली
हिरवळही छान,
त्यात कोकिळेची सुरेल तान
मला ऐक म्हणाली
डोंगरातून वाहणारा झरा,
त्यात पाण्याच्या धारा
ओंजळीत भर म्हणाली
वातावरणातला वारा,
त्यात सुगंधाने चढलेला मातीच पारा
श्वासात सामाव म्हणाली
हे सर्व आनंदाचे क्षण
घेऊन पावसाची सर
घरी माझ्या आली
मला चिंब भिजवून
आठवणींना हृदयात
साठव म्हणाली !

**- ज्योती रावराणे,**
**कांजूरमार्ग, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## माथेरानच्या पार्किंगसाठी एमपी ९३ भुखंड नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा ऐतिहासिक निर्णय...



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२६, माथेरान :** माथेरानमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पार्किंगच्या प्रश्नावर अखेर मोठे यश मिळाले असून, एम.पी. ९३ (वाडिया सॅनेटोरियम) हा भूखंड माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे माथेरानमधील पार्किंग व भविष्यातील लॉजिस्टिक हब उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या संपूर्ण प्रक्रियेची सुरुवात सन २००७ मध्ये तत्कालीन माथेरान नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी केली होती. एम.पी. ९३ अर्थात वाडिया सॅनेटोरियम म्हणून ओळखला जाणारा हा भूखंड पार्किंगसाठी उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी नगरपरिषदेमार्फत ठराव करून शासनाकडे प्रस्ताव सादर केला. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी विपीन विनायक यांनी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करून सदर जागा शासन ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. माथेरानच्या भविष्यातील पार्किंग व लॉजिस्टिक हबच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरला.

यानंतर विविध प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रिया सुरू राहिल्या. या दरम्यान माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनीही त्यांच्या परीने या प्रस्तावासाठी प्रयत्न केले. पुढे काही काळ हा प्रस्ताव रखडला असला तरी मागील दोन वर्षांत मनोज खेडकर यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या समवेत शासनस्तरावर सातत्याने व जोरदार पाठपुरावा केला. विविध बैठका, पत्रव्यवहार आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव अंतिम टप्प्यापर्यंत नेण्यात आला.

या कालावधीत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनीही संबंधित मंत्रीमहोदयांची भेट घेऊन माथेरानच्या पार्किंगच्या प्रश्नाची तीव्रता शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. सर्व स्तरांवर झालेल्या संयुक्त प्रयत्नांमुळे अखेर शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. एम.पी. ९३ हा भूखंड आता माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरित झाल्याने शहरातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक असलेल्या पार्किंगच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भविष्यात येथे आधुनिक वाहनतळ व लॉजिस्टिक हब उभारल्यास पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, आमदार महेंद्र थोरवे तसेच या प्रक्रियेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांचे माथेरानकरांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## निंबळक येथे 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत खरीप पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२६, राहुरी (अहिल्यानगर) :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या वतीने 'खेत बचओ अभियान' अंतर्गत निंबळक येथे खरीप हंगामातील पिकांच्या व्यवस्थापनावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली आणि संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके, अधिष्ठाता (कृषी) डॉ. सत्तापा खरबडे व विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे यांचे मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्वारी सुधार प्रकल्पाचे प्रमुख व सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक यांनी खरीप हंगामातील प्रमुख पिके - बाजरी, मुग, उडीद व तूर यांच्या सुधारित वाणांची माहिती देत बदलत्या हवामानाचा पिकांवर होणारा परिणाम स्पष्ट केला.

यावेळी कार्यक्रमात 'धनशक्ती' या बाजरी वाणाचे प्रात्यक्षिकासाठी बियाणे तसेच जैविक खते शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. विद्यापीठ निर्मित जैविक खते, कीडनाशके व फुले ग्रेड-२ चा वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले. अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र हिले यांनी शेतीतील खर्च व्यवस्थापन व यांत्रिकीकरणाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. विवेक शिंदे यांनी मका लागवड तंत्रज्ञानावर सविस्तर मार्गदर्शन करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे समाधान केले.

डॉ.दत्तात्रय पाचारणे यांनी संतुलित खत व्यवस्थापन, लागवड तंत्रज्ञान तसेच फुले कृषी तंत्रज्ञान घरोघरी, समृद्धी येईल गावोगावीया उपक्रमांची माहिती देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचे नियोजन साईबाबा कृषी गट, निंबळक व ज्वारी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून करण्यात आले. याप्रसंगी श्री. भाऊराव गायकवाड, बाबासाहेब कोतकर, अजय लामखडे, घनश्याम म्हस्के तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.उदय दळवी, डॉ.विजय शिंदे, बाळासाहेब चौधरी, दीपक चव्हाण व रावजी पठारे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार कृषी सहाय्यक सुनील कोकरे यांनी केले.

## ऊसाच्या शेतात जनावरे घुसवून पिकाची नासधूस

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.२६, उंब्रज (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता.कराड येथील रहिवासी विशाल गोपाळराव थोरात यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या उत्तरमांड नदीकाठालगत असलेल्या गट क्रमांक ३८/३ मधील मसवटे नावाच्या शेतात अज्ञात व्यक्तींनी जाणीवपूर्वक जनावरे घुसवून ऊस पिकाची नासधूस केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यंदा मान्सूनवर अल निनोच्या प्रभावामुळे अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शेतकरी आधीच दुष्काळी परिस्थितीशी झुंज देत आहे. अशा कठीण काळात मोठ्या कष्टाने जोपासलेले ऊसपीक अज्ञातांकडून जनावरे घुसवून उद्ध्वस्त करण्यात आल्याने शेतकऱ्याच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. शेती हा अनेक कुटुंबांचा एकमेव उदरनिर्वाहाचा आधार असून अशा प्रकारच्या घटनांमुळे शेतकऱ्यांचे मनोबल खच्ची होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

एखाद्या शेतकऱ्याने दिवस-रात्र मेहनत करून उभे केलेले पीक काही क्षणांत उद्ध्वस्त करणे ही अत्यंत निंदनीय बाब असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. अशा अपप्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक असून, अन्यथा भविष्यात अशा घटना वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावता कामा नये, या उक्तीप्रमाणे अशा कृत्यांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. या दुर्दैवी प्रकाराची चर्चा परिसरात चांगलीच रंगली असून ढुंगणावर पोकळ बांबूचे फटके पडल्यानंतरच संबंधित व्यक्ती सुधारणार का? अशी संतप्त प्रतिक्रिया नुकसानग्रस्त थोरात कुटुंबीयांकडून उमटत आहे.

## नळ कनेक्शनला मोटारी लावून पाण्याचा उपसा ; गावचा पाणीपुरवठा विस्कळीत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, कराड (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता.कराड येथे दिवसेंदिवस तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर काही कुटुंबांकडून सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेच्या नळ कनेक्शनला थेट विद्युत मोटारी बसवून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात असल्याची चर्चा सध्या गावभर सुरू आहे.

या प्रकारामुळे गावातील इतर सर्वसामान्य नागरिकांच्या नळांना अत्यल्प दाबाने पाणी मिळत असल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.गावातील अनेक भागांमध्ये सार्वजनिक पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच पाण्याचा दाब कमी होतो. काही घरांमध्ये नळातून पाणी येणे पूर्णपणे बंद होते. यामागे सार्वजनिक नळजोडणीवर थेट मोटारी लावून पाणी खेचले जात असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.काही ठिकाणी मोटारींद्वारे बंगल्यांच्या वरच्या मजल्यांवर तसेच छतावरील साठवण टाक्यांमध्ये पाणी चढवले जात असल्याची चर्चा आहे. सार्वजनिक योजनेतील पाणी काही मोजक्या लोकांकडून मोठ्या प्रमाणात खेचले जात असल्यास हा प्रकार अत्यंत गंभीर असून त्याची चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी जोर धरत आहे.सध्या राज्यात अनेक ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

मान्सूनचा वेग मंदावलेला असताना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. अशा परिस्थितीत सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थेचा गैरवापर करून स्वतःच्या सोयीसाठी मोठ्या प्रमाणात पाणी उपसणे ही सामाजिक जबाबदारीला हरताळ फासणारी बाब असल्याचे जाणकारांचे मत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार,काही ठिकाणी



मोटारीच्या सहाय्याने खेचलेले पाणी अंगण धुणे तसेच इतर दुय्यम कामांसाठी वापरले जात असल्याचीही चर्चा आहे. गावातील अनेक कुटुंबांना पिण्याचे पाणी मिळणे कठीण झालेले असताना अशा प्रकारे पाण्याची उधळपट्टी होत असल्याने संतापाची लाट निर्माण झाली आहे.

दरम्यान, या कथित प्रकाराबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका जाहीर केलेली नसल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे. गावातील जबाबदार नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे संपूर्ण गावाचा सर्व्हे करण्याची मागणी केली आहे. प्रत्येक नळ कनेक्शनची तपासणी करून ज्या ठिकाणी थेट मोटारी बसविल्या आहेत त्यांच्यावर नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई करावी तसेच सर्व नागरिकांना समान आणि न्याय्य पद्धतीने पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.गावातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप न केल्यास भविष्यात नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सार्वजनिक मालमत्तेचा आणि सार्वजनिक पाणीपुरवठा व्यवस्थेचा गैरवापर थांबवून प्रत्येक घरापर्यंत समान हक्काने पाणी पोहोचविण्याची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाची आहे.आता ग्रामपंचायत प्रशासन या गंभीर प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून कारवाई करणार की नेहमीप्रमाणे मौन बाळगणार याकडे संपूर्ण कळंत्रेवाडीकरांचे लक्ष लागले आहे.

## खंडाळा तालुक्यात ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करू नये - प्रविण वीर




**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.२६, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यात महावितरण कंपणीकडून नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती नागरिकांनवर केली जाणार किंवा जात आहे. मात्र, ही प्रक्रिया करताना नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना दिली जात नाही या संदर्भात उपकार्यकारी अभियंता उपविभागीय कार्यालय खंडाळा श्री फुलचंद फड साहेब उपकार्यकारी अभियंता यांच्या अनुपस्थितीत श्री बरावकर साहेब यांच्याकडे अखिल भारतीय मराठा महासंघ खंडाळा तालुका यांच्याकडुन निवेदन देण्यात आले असून त्या संदर्भात खालील प्रमुख मागण्यांकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो :

**१. सक्ती बंद करावी :** सर्वोच्च न्यायालय आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार, कोणत्याही ग्राहकाच्या संमतीशिवाय त्याच्या घरी किंवा सोसायटीत सक्तीने स्मार्ट मीटर बसवू नयेत.

**२. पूर्वसूचना देणे आवश्यक :** मीटर बदलण्याबाबत आधी ग्राहकांना विश्वासात घेऊन लेखी पूर्वकल्पना देणे बंधनकारक असताना, थेट ४८ तासांची नोटिस किंवा मेसेज पाठवून दबाव आणला जात आहे, जो पूर्णपणे अन्यायकारक आहे.

**३. वाढीव बिलांची भीती :** सध्याच्या मीटरमध्ये कोणताही तांत्रिक बिघाड नसताना ते बदलले जात आहेत. नवीन स्मार्ट मीटरमुळे नागरिकांना भरमसाट वीज बिल येत असल्याच्या अनेक तक्रारी समोर येत आहेत. सध्याच्या जुन्या वीज मिटर्समध्ये अचूक रिडिंग येत असताना नवीन मीटर लावून सर्वसामान्यांच्या खिशावर आर्थिक भार टाकू नये. परिसरातील नागरिकांचा विरोध पाहता, जोपर्यंत ग्राहक स्वतःहून लेखी संमती देत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर स्मार्ट मीटर बसविण्याची जबरदस्ती करू नये असे निवेदन देण्यात आले तसेच ग्राहकांच्या तक्रारीनुसार आपण ग्राहकांची दिशाभुल करुन आपले कर्मचारी स्मार्ट मीटर बसवित आहेत किंवा बसविण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी आपण योग्य ती कारवाई आपल्या कर्मचाऱ्यांवर त्वरीत करावी. पुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपणास या निवेदनाद्वारे इशारा देण्यात येत आहे की, नागरिकांच्या सहमतीशिवाय जबरदस्तीने मीटर बसवल्यास होणाऱ्या आंदोलनांची जबाबदारी पूर्णपणे प्रशासनाची राहील सदर निवेदन देताना


अखिल भारतीय मराठा महासंघाच सातारा जिल्ह्याचे दत्तात्रय पाटील अध्यक्ष नामदेव चव्हाण उपाध्यक्ष जितेंद्र भोसले सरचिटणीस छायाताई भोसले महीला उपाध्यक्ष, खंडाळा तालुक्याचे प्रविण वीर अध्यक्ष तुकाराम यादव उपाध्यक्ष अंकुश पवार संघटक भरत देशमुख कोषाध्यक्ष गुलाबराव गायकवाड सरचिटणीस दत्तात्रय घाटे बाळासाहेब पानसरे सुनिल पवार दिलीप यादव श्रीपती भोसले व इतर पदाधिकारी सभासद कार्यकरते वीज मीटर ग्राहक उपस्थित होते.

## आयुक्त मुंडेंच्या बदलीच्या चर्चेचा मुद्दा विधानसभेत...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट दुग्धजन्य पदार्थ, गुटखा, तंबाखू आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्य वस्तूंविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने सुरू केलेल्या धडक कारवाईच्या पार्श्वभूमीवर विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीबाबत विविध स्तरावर चर्चेचा मुद्दा थट विधानसभेत पोहचला आहे.

नगर पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी तुकाराम मुंढे यांची बदली करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, अशी स्पष्ट ग्वाही दिल्याने या चर्चांना




पूर्णविराम मिळाला आहे.

पावसाळी अधिवेशन दरम्यान आमदार दाते यांनी राज्यातील वाढत्या भेसळीच्या प्रकारांकडे सरकारचे लक्ष वेधले. मे आणि जून महिन्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त दूध, दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, पेढा, गुळ, चहा पावडर, आंबा पिकविण्याची पावडर, गुटखा, तंबाखू, सुगंधी सुपारी, मावा तसेच इतर निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचा कोट्यवधी रुपयांचा साठा जप्त करण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला. तसेच अशा कारवायांमुळे विभागाचा दबदबा वाढला असून राज्यातील भेसळ माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार दाते यांनी विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धडक मोहिमेचा उल्लेख करत, ही मोहीम पुढेही सुरू राहणार का आणि आयुक्तांची बदली करण्याचा कोणताही विचार शासनाच्या पातळीवर आहे का, असा थेट सवाल उपस्थित केला.

त्यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, भेसळयुक्त अन्नपदार्थाविरोधातील मोहिमेअंतर्गत राज्यभरातून १,९३० नमुने विलेषणासाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. तसेच शासकीय व वैद्यकीय संस्थांमध्ये वापरण्यासाठी आणण्यात आलेल्या निर्जंतुक न केलेल्या सर्जिकल साहित्याचा ७४ लाख ८५ हजार ५०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. भेसळ रोखण्यासाठी विभागाकडून कारवाई सुरू असून ती यापुढेही कायम सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या बदलीबाबत सुरू असलेल्या चर्चांवर उत्तर देताना मंत्री झिरवाळ यांनी संबंधित आयुक्तांची बदली करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे ठाम विधान केले.

## पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या खा.दिना पाटील यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करा

### खापरखेडा पत्रकार संघाची मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२६, नागपूर :** मुंबई ईशान्य मतदार संघाचे शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना जाहीरपणे जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या अश्लाघ्य कृत्याचा तीव्र निषेध नोंदवत (नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न) खापरखेडा पत्रकार संघाने राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे खासदार संजय दिना पाटील यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी केली आहे.

पत्रकार प्रतिक्रिया नोंदवित असताना खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना अत्यंत अपमानास्पद शिवराळ आणि आक्षेपार्ह भाषेचा वापर केला, इतकेच नव्हे तर मी तुम्हाला मारून टाकेन अशी थेट जीवे मारण्याची धमकी दिली. सदर घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांवर लोकप्रतिनिधी कडूनच झालेल्या हल्ल्यामूळे पत्रकार वर्गात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने सत्ताधाऱ्यांच्या या गुंडशाहीचा निषेध केला आहे. पत्रकारांना धमकी देणे म्हणजे लोकशाहीला आव्हान, दोषींना कोणताही माफी नाही, पत्रकारांना धमकवणाऱ्यांना थेट जेलची हवा खावी लागणार असे आश्वासन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी दिले होते.

सत्ताधारी पक्षाचे खासदारच जर अशा प्रकारे कायदा हातात घेत असतील तर सर्वसामान्य पत्रकारांनी सुरक्षेची अपेक्षा कुणाकडून करायची? असा प्रश्न निर्माण झाला आहे. खासदार सत्ताधारी मित्रपक्षाचे असले तरी कायदा सर्वांसाठी समान आहे. त्यामुळे खासदार संजय दिना पाटील यांच्यावर 'पत्रकार संरक्षण कायद्या' सह भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती पोलीस महासंचालक व माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत या गंभीर प्रकरणावर राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस काय पाऊल उचलतात याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# नागपूर, विदर्भ आणि मध्यभारताच्या विकासाचे इंजिन म्हणून नागपूर विमानतळ नावारूपाला येणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** नागपूर व परिसरात मेन्टेनन्स कमांड, ऑटो एव्हिएशन आणि डिफेन्स एव्हिएशन मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. या उद्योगांसह कृषी, पर्यटन आदींच्या विकासाला गती मिळून डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ हे नागपूर,विदर्भ आणि मध्य भारतातील आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.



नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू, केंद्रीय रस्ते विकास व महामार्गमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ परिसरात आयोजित विमानतळ हस्तांतरण सोहळयात ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशात नवनवीन विमानतळ उभारले जात असताना नागपूर विमानतळ मोठे व सुंदर करण्याचा आम्ही संकल्प केला. २०१८ मध्ये यासंदर्भात निविदा काढण्यात आल्या. २०१९ मध्ये जीएमआर कंपनी पात्र ठरली होती. मात्र या संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आणि अखेर सकारात्मक निर्णय आला. केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाला पूर्ण पाठिंबा दिला व केंद्रीय मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मंजुरी दिली आणि आज रीतसरपणे या विमानतळाच्या आधुनिकीकरण, विस्तार आणि विकासाच्यादृष्टीने जीएमआर कंपनीला विमानतळ हस्तांतरण करण्यात आले आहे.

या विमानतळावर प्रवासी व कार्गो वाहतूक होण्यासाठी दोन टर्मिनल आणि दोन धावपट्ट्या होणे गरजेचे आहे. हस्तांतरणांमुळे आता हा मार्ग मोकळा झाला आहे. या विमानतळाला मेट्रो ट्रेन आणि रस्त्यांची उत्तम कनेक्टिव्हिटी देण्यात आली आहे. विमानतळाचा विस्तार लक्षात घेऊन येत्या काळात सुयोग्य कनेक्टिव्हिटी देण्याच्या दिशेनेही समांतर कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या एक वर्षात या विमानतळावर येणाऱ्या प्रवाशाला येथील सौंदर्य आणि सुविधेत अभूतपूर्व बदल दिसावा असे काम व्हावे. तसेच २०२९ पर्यंत या विमानतळाचे काम पूर्ण करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्य शासनाकडून मिहान आणि एमआयडीसी अंतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात येईल व आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. नागपूर व परिसर आणि विदर्भात होत असलेला उद्योग क्षेत्राचा विकास शेजारील तेलंगणा, छत्तीसगड व मध्यप्रदेश या राज्यांनाही मोठा फायदा होऊन या भागाच्या आर्थिक विकासासाठी हे विमानतळ महत्त्वपूर्ण ठरेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

**विमानतळ हस्तांतरण हा नागपूरच्या जनतेसाठी ऐतिहासिक क्षण – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे जीएमआर कंपनीला हस्तांतरण होणे हा ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, नागपूरसह मध्य भारतातील प्रवाशांना उत्तम हवाई वाहतुकीसोबतच कार्गोहबच्या माध्यमातून निर्यातीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळणार आहे. नागपूर हे मध्यवर्ती शहर आहेच पण देशाच्या चारही मेट्रो शहरांसाठी केवळ तासांत संवाद पोहोचणे येथून शक्य आहे. नागपूर हे लॉजिस्टिक कॅपिटल हब म्हणूनही ओळखले जात असल्यामुळे विमानतळाचा विकास तसेच दुसऱ्या धावपट्टीची आवश्यकता या हस्तांतरणामुळे पूर्ण होणार आहे. नागपूर शहराच्या सभोवताली व्याघ्र प्रकल्प असून ३५० पेक्षा जास्त वाघांची संख्या आहे. त्यामुळे देश व विदेशातील पर्यटक येथे भेटी देतात. या पर्यटनाला विमानतळामुळे चालना मिळणार आहे. नागपूर सभोवताली मोठ्या प्रमाणात खनिज संपदा उपलब्ध आहे. त्यामुळे येथील खनिज आधारित उद्योगाला गती मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**विमानतळ हस्तांतरणामुळे विदर्भाच्या विकासाचा टेक ऑफ – केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री**

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी नागपूर विमानतळाचे केवळ हस्तांतरणच होणार नसून हा क्षण विदर्भाच्या विकासाचा टेकऑफ असल्याचे सांगितले. विमानतळ हे केवळ प्रवासी वाहतुकीचे केंद्र न राहता उद्योग विकासाचे प्रमुख केंद्र ठरणार आहे. प्रवासी वाहतुकी सोबतच येथे कार्गो हब होणार असल्यामुळे विदर्भाच्या विकासाचे नवे दालन या विमानतळाच्या माध्यमातून खुले होणार आहे.

विमानतळाचा विकास करताना सध्याची वर्षाला ३० लाख प्रवासी क्षमता वाढून येत्या काळात या विमानतळावर ६० लाख प्रवासी क्षमता होईल असा विश्वास व्यक्त करून ३ कोटी प्रवाशी क्षमतेचे उद्दिष्ट गाठले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपुरातून दुबई, सिंगापूरसह युरोप, अमेरिका तसेच जगातील प्रमुख देशांना थेट जोडणारी विमानसेवा सुरू करण्याला प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

खासदार सर्वश्री प्रफुल्ल पटेल, माया इवनाते आणि श्यामकुमार बर्वे, आमदार परिणय फुके, संजय मेश्राम, समीर मेघे, नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर, जीएमआरचे व्यावसायिक चेअरमन जी.बी.एस.राजू,मिहान इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक नागपूर मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यावेळी उपस्थित होते.

तत्पूर्वी, जीएमआरचे व्यावसायिक चेअरमन जी.बी.एस.राजू आणि मिहान इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक नागपूर मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू ,केंद्रीय रस्ते विकास व महामार्गमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळाचे हस्तांतरण केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते बोध चिन्हाचे अनावरण झाले. नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांच्या हस्ते जीएम आर नागपूर विमानतळ संकेत स्थळाचे अनावरण झाले.

# नमामी चंद्रभागा कागदावर, जलजीवन मिशन अपूर्ण

## अनेक योजना रखडल्या, आ. पाटलांनी मांडली पाण्याची विदारक वस्तुस्थिती

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** राज्यातील पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीवर माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांनी आज अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी अल्पकालीन चर्चा करताना सभागृहात सरकारला धारेवर धरले. पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी न लावल्याने शेतकरी चिंतेत असून भविष्यातील पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

आ. पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना जलसंधारणाला दिलेले महत्त्व आजही मार्गदर्शक आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा विचार अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. महापुरात पाणी वाहून जाते आणि उन्हाळ्यात टंचाईचा सामना करावा लागतो, हे नियोजनाचे अपयश असल्याचे त्यांनी सांगितले. उजनी धरणात पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील सांडपाणी मिसळत असल्याने पाण्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. दूषित पाण्यामुळे उजनी धरण परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून ही बाब चिंताजनक असल्याचे पाटील यांनी नमूद केले.

> पंढरीतील भाविकांसाठी शुद्ध पाणी द्यामहाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीत येणाऱ्या लाखो भाविकांना तसेच परिसरातील नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने विशेष लक्ष द्यावे, अशी आग्रही मागणी आ. अभिजीत पाटील यांनी शेवटी केली. माढा व पंढरपूर परिसरातील नागरिकांना नियमित व शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलजीवन मिशनची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, असेही ते म्हणाले.

**नमामी चंद्रभागा रखडली,**



**जलजीवन मिशन अपूर्ण**

नमामी चंद्रभागा योजनेला अपेक्षित गती मिळालेली नसून चंद्रभागा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असली तरी अनेक ठिकाणी योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. जलस्रोत विकसित न करता केवळ वितरण व्यवस्था उभारण्यात आल्याने नागरिकांना अपेक्षित लाभ मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

माढा मतदारसंघ : मंजूर झालेल्या १७८ योजनांपैकी अनेक योजना अपूर्ण असून प्रत्यक्षात फार कमी गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पंढरपूर तालुका: अनेक गावांमध्ये भूजल खारट झाले असून पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. सिना नदी, सिना-माढा उपसा सिंचन योजना आणि उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे.

आ. पाटील यांनी सभागृहात पाणी प्रश्नावर १५ मुद्दे मांडले. भूजल पातळी वाढविण्यासाठी तलाव, बंधारे आणि जलसाठ्यांचे खोलीकरण व पुनर्भरणाची व्यापक मोहीम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शेतकरी, जनावरे आणि नागरिकांना मिळणाऱ्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

# कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** राज्य शासनाने थकीत पीक कर्जाच्या ओझ्यातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली असून, या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच एग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणीची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांना एकवेळ तडजोड योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यानंतर शासनाच्या योजनेचा लाभ घेता येणार असून, यासाठी दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने विशेष तरतूद केली असून, सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या



पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून, शासनामार्फत याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण व एग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य राहील. अनेक पात्र शेतकरी आधार क्रमांक बँक खात्याची अपूर्ण माहिती किंवा डिजिटल नोंदणीच्या अभावामुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आपले आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक व जमिनीच्या नोंदी अद्ययावत करून मृत कर्जदार खातेदारांच्या वारसांची नोंद करून घेणे आवश्यक आहे.

# थोडक्यात

## बेलवडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अश्विनी केतन पाटील यांची बिनविरोध निवड

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२५, पेण :** पेण तालुक्यातील बेलवडे ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अश्विनी केतन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान उपसरपंच जान्या आंब्या वीर यांनी आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर स्वेच्छेने राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी ग्रामपंचायत कार्यालयात निवड प्रक्रिया पार पडली. या निवडीत एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने अश्विनी पाटील यांची सर्वानुमते बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

निवडीनंतर त्यांचे विविध मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निलिमा पाटील, जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य डी. बी. पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळाराम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव मानकर, भाजप नेते ललित पाटील, पंचायत समितीचे उपसभापती संजय डंगर, गटनेते विवेक म्हात्रे, मावळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मंगेश दळवी, नगरसेवक नीलकंठ म्हात्रे, खोपोलीचे नगरसेवक संदीप पाटील, वसंत आगिवले, दत्तात्रय दरेकर, नंदकुमार पाटील, सरपंच हरेश पाटील, भाजप युवा मोर्चाचे स्वप्निल म्हात्रे, माजी सरपंच अमित पाटील,वरवणे उपसरपंच तुकाराम गायकर, तसेच ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, महिला व विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बेलवडे ग्रामपंचायत अनेक वर्षांपासून बिनविरोध निवडीची परंपरा जपत असून उपसरपंचपदासाठी सर्व सदस्यांना सन्मानाची संधी दिली जाते. माजी खासदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वाखाली गावातील कार्यकर्ते एकदिलाने कार्य करत आहेत. गावातील ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांना नेतृत्वाची संधी मिळत असल्याने ग्राम विकासाला चालना मिळत आहे.

अश्विनी केतन पाटील या उच्चशिक्षित असून त्यांच्या निवडीमुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. निवडीनंतर ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## पनवेल महापालिका क्षेत्रात रविवारी पोलिओ लसीकरण

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.२६, पनवेल :** महानगरपालिका क्षेत्रात येत्या रविवारी (२८ जून) राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लस देण्यात येणार आहे. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाने पोलिओ लसीकरणाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.

यामध्ये ० ते ५ वयोगटातील अपेक्षित ६४ हजार १७२ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून मोहीमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २६ नागरी आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात ३९२ स्थायी, २३ ट्रान्झिट व ४५ फिरते मोबाईल असे एकूण ४६० पोलिओ लसीकरण पथके कार्यरत असणार आहेत.

या लसीकरण मोहिमेसाठी स्थायी, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड अशा ठिकाणी ट्रान्झिट व मोबाईल पथके तयार करण्यात आली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ.गणेश नायर यांनी या लसीकरण मोहिमेचे सूक्ष्म नियोजन केले आहे. या पोलिओ लसीकरण मोहीम अंतर्गत राहिलेल्या वंचित बालकांना महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्यावतीने पुढील चार दिवस पोलिओ लसीकरण करण्यात येणार आहे. एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये, यासाठी या पोलिओ मोहिमेत सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## धोकादायक अवस्थेतील डीपीमुळे दुर्घटनेची शक्यता उंब्रज महावितरणने तातडीने दखल घेण्याची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२६, कराड (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता.कराड येथील कावळ्याचे माळ परिसरातील शेतशिवारात असलेल्या महावितरणच्या डीपीची विद्युत पुरवठा केबल अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, केबलवरील प्लास्टिकचे संरक्षक आवरण (कोटिंग) खराब झाल्यामुळे आतील विद्युत तारा उघड्या पडल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी कधीही गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

या डीपीच्या परिसरात शेतकरी व शेतमजूर यांची नियमित वर्दळ असते. तसेच दुरुस्तीच्या कामासाठी येणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही विजेचा धक्का बसून जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हा धोका अधिकच वाढला असून, कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या धोकादायक डीपीची तातडीने पाहणी करून खराब झालेली केबल बदलावी, तसेच आवश्यक ती सुरक्षितता उपाययोजना करून संभाव्य दुर्घटना टाळावी,अशी जोरदार मागणी कळंत्रेवाडी परिसरातील शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

# वढोलीच्या १,०४४ ग्रामस्थांचा दारू दुकानाला एकमुखी विरोध...

**अक्षराज : संतोष बंडुरकर**

**दि.२६, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** गोंडपिपरी तालुक्यातील वढोली गावाने दारू दुकान विरोधात आपल्या लढ्याचा आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेली विशेष ग्रामसभा तब्बल १० तास चालून रात्री ९ वाजता संपली. कडक उन्हाची पर्वा न करता तसेच सायंकाळच्या पावसातही ठामपणे उपस्थित राहिलेल्या हजाराहून अधिक ग्रामस्थांनी गावात सुरू करण्यात आलेले दारू दुकान कायमस्वरूपी बंद करण्याच्या बाजूने एकमुखी कौल दिला. अखेर ग्रामसभेत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला. वढोली येथे सुरू करण्यात आलेल्या दारू दुकानाविरोधात गेल्या काही दिवसांपासून ग्रामस्थांचा संघर्ष तीव्र

झाला होता. शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोज सायंकाळी ४ वाजता सुरू झालेले रस्ता रोको आंदोलन शनिवार, दिनांक २७ जून २०२६ रोजी पहाटे २ वाजेपर्यंत, म्हणजे तब्बल १० तास सुरू होते. या आंदोलनामुळे गोंडपिपरी – मूल मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. सुमारे ५०० महिला, पुरुष, युवक व नागरिकांनी आंदोलनात सहभागी होत, प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा बोलावली होती.

ग्रामसभे दरम्यान गावातील सामाजिक कार्यकर्ते व युवकांनी लोकवर्गणीतून भोजनाची व्यवस्था केली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत सामाजिक एकजुटीचे दर्शन घडविले. गावातील सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवून नागरिकांनी ग्रामसभेला प्राधान्य दिले. विशेष ग्रामसभेत गावातील एकूण १,६१४ मतदारांपैकी १,०४४ मतदारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून दारू दुकान हटविण्याच्या बाजूने लेखी स्वाक्षरीद्वारे आपले मत नोंदविले. प्रत्येक मतदाराची आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्राच्या आधारे पडताळणी करण्यात आली. त्यामुळे गावातील बहुसंख्य नागरिकांचा दारू दुकानाला ठाम विरोध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले.

ग्रामसभा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यातआला होता. संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडल्याने प्रशासनानेही समाधान व्यक्त केले.दरम्यान, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपविभागीय दंडाधिकारी अर्जुन पावरा यांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम १४२(२) अन्वये वढोली येथील एस.के.बार अँड रेस्टॉरंट हे दारू दुकान २० जून ते ३० जून २०२६ या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मात्र हा निर्णय तात्पुरता असल्याने ग्रामस्थांनी दारू दुकान कायमस्वरूपी हटविण्याची मागणी कायम ठेवली आहे. विशेष ग्रामसभेला संवर्ग विकास अधिकारी संजय पुप्पलवार, ठाणेदार रमेश हत्तीगोटे, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक अभिनंदन कांबळे, दुय्यम निरीक्षक सी. टी. दरोडे, अतुल भिवगडे, जगदीश कापटे, नायब तहसीलदार शेखर वेटे, विस्तार अधिकारी जीवन प्रधान, मंडळ अधिकारी सुकेसनी कांबळे, तलाठी अश्विनी शेळके, पोलिस उपनिरीक्षक मंगेश कराडे तसेच ग्रामसेवक जितेंद्र खोब्रागडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# तुर्भे विभाग कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतीतील पाणीपुरवठा व मल:निस्सारण जोडणी खंडीत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अमोली को.ऑ.हौ.सो. लि., भुखंड क्र.२८, सेक्टर ३०, सानपाडा, नवी मुंबई ही इमारत सन २०१९-२० मध्ये धोकादायक इमारती घोषीत करणेबाबत महापालिका समितीने सी-१ (अतिधोकादायक, रहाण्या अयोग्य तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या) या प्रवर्गामध्ये घोषीत करण्यात आलेली आहे.सी-१ प्रवर्गात मोडत असलेल्या इमारती यापुर्वी धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीचा वापर तात्काळ बंद करुन, धोकादायक इमारत रिकामी करणेबाबत संबंधितास या कार्यालयामार्फत नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतु, अद्याप सदर धोकादायक इमारतीतील सदनिकांचा निवासी वापरासाठी वापर चालू असल्याचे निदर्शनास आलेले आहे.तसेच सी-१ प्रवर्गात मोडणाऱ्या इमारती निष्कासित/रिकाम्या करणेचे दृष्टीने उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.११३५/ २०१४ मधील उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इमारतीची विद्युत जोडणी, जल जोडणी व गॅस पुरवठा खंडीत करणेबाबत कळविले आहे.त्याअनुषंगाने, तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात सी-१ या प्रवर्गात अतिधोकादायक, रहाण्यास अयोग्य तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या अमोली को.ऑ.हौ.सो. लि., भुखंड क्र.२८, सेक्टर-३०, सानपाडा, नवी मुंबई या इमारती मधील सदनिकेचा रहिवास वापर बंद करुन त्वरीत रिकामी करणेची कार्यवाही करणेकरीता सदर इमारतीचा पाणीपुरवठा व मल:निस्सारण जोडणी खंडीत करणेची कार्यवाही दि. २३/०६/२०२६ रोजी करण्यात आली. तसेच सदर इमारतीचा वीजपुरवठा खंडीत करणेची कार्यवाही देखील लवकरात लवकर करण्यात येणार आहे.सदर मोहिम आयुक्तांच्या आदेशान्वये अति. आयुक्त राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त, तुर्भे सागर मोरे, यांचे नियंत्रणाखाली तुर्भे विभागातील विनोद आंब्रे, कनिष्ठ अभियंता व पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये करण्यात आली आहे.

# शहापूर उपजिल्हा रुग्णालयात पावसाळी आजारांवर नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याची मागणी

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध साथीच्या आजारांचा धोका वाढत असताना, उपजिल्हा रुग्णालयात तातडीने आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. रुग्ण कल्याण समिती सदस्य हेमंत रामचंद्र मोरे यांनी वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय शहापूर यांना निवेदन देत ही मागणी केली आहे. या निवेदनात पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, लेप्टोस्पायरोसिस, अतिसार, तसेच इतर संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयात आवश्यक औषधे, सलाईन, ऑक्सिजन, तसेच आपत्कालीन उपचारासाठी लागणारी साधनसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

तसेच रुग्णालय परिसरात स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था करणे, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे यावरही भर देण्यात आला आहे. आपत्कालीन विभाग (Emergency Ward) २४ तास कार्यरत ठेवून अतिरिक्त डॉक्टर, नर्स व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. गंभीर रुग्णांसाठी ऑक्सिजन बेड, व्हेंटिलेटर, मॉनिटर यांसारख्या जीवनावश्यक उपकरणांची सुविधा वाढविणे, तसेच दुर्गम भागातील रुग्णांना तातडीने सेवा देण्यासाठी अँब्युलन्स व्यवस्था सक्षम ठेवण्याची गरजही निवेदनात नमूद करण्यात आली आहे.पावसाळ्यात नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# अमली पदार्थांचे व्यसन - मेंदूला अनियंत्रित करणारे घातक विष




संपूर्ण सजीव सृष्टीमध्ये मनुष्याला सर्वात बुद्धिमान प्राणी मानले जाते आणि त्याम ागील प्रमुख कारण म्हणजे त्याचा विकसित मेंदू. मानवी शरीरातील प्रत्येक हालचाल, निर्णय आणि वर्तनाचे नियंत्रण मेंदूद्वारेच केले जाते. मेंदू योग्य प्रकारे कार्य करत नसेल, तर मनुष्याचे अस्तित्व केवळ एका जिवंत शरीरापुरते मर्यादित राहते. दुर्दैवाने, व्यसनाचा सर्वांत जास्त परिणाम याच मेंदूवर होतो. मादक पदार्थांचे सेवन केल्याने व्यक्तीची विचारशक्ती आणि योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता कमी होते. व्यसनाधीन अवस्थेत व्यक्तीचे स्वतः च्या वर्तनावर आणि भावनांवर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे अनेक गुन्ह्यांच्या मुळाशी व्यसनाची भूमिका आढळून येते. व्यसनाची गरज भागविण्यासाठी अनेक जण चोरी, दरोडे, हिंसाचार आणि इतर बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करतात. आर्थिक अडचणी वाढल्यानंतर परिस्थिती इतकी गंभीर बनते की काही व्यक्ती स्वतःच्या कुटुंबीयांशीही हिंसक वर्तन करू लागतात. अनेकदा प्रसारमाध्यमांत अशा घटना समोर येतात की, व्यसनामुळे कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि निरपराध लोकांचा जीवही जातो.

व्यसन केवळ मेंदूलाच नव्हे तर शरीरातील इतर महत्त्वाच्या अवयवांनाही हळूहळू हानी पोहोचवते. यामुळे अनेक गंभीर आणि खर्चिक आजार उद्भवतात, जे अखेरीस अकाली मृत्यूचे कारण ठरू शकतात. म्हणूनच व्यसन हे कोणत्याही प्रकारे मनोरंजन किंवा मानसिक आरामाचे साधन नसून, जीवन हळूहळू नष्ट करणारे घातक विष आहे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयामार्फत दरवर्षी व्यसनमुक्ती बाबत जनजागृती मोहीम राबविली जाते. यावर्षी १७ जून ते २६ जून २०२६ या कालावधीत 'नशामुक्त सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत देशभर विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यावर्षीची संकल्पना आहे – जागतिक स्तरावरील अमली पदार्थांची समस्या : त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणी, नवीन आव्हाने आणि त्यावरील नवे उपाय.

आज अमली पदार्थ सहज उपलब्ध होत असल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. लहान मुलांपासून युवक आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोक या संकटाच्या विळख्यात अडकताना दिसत आहेत. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार नागपूर शहरात अवघ्या पाच महिन्यांत पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अम ली पदार्थ जप्त करण्यात आले. एका शहरातील ही परिस्थिती असेल, तर संपूर्ण राज्य आणि देशात अम ली पदार्थांची तस्करी किती मोठ्या प्रमाणावर होत असेल याची सहज कल्पना करता येते. ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून देशाच्या भविष्यासाठीही गंभीर धोका आहे. युवकवर्ग हा कोणत्याही राष्ट्राची सर्वांत मोठी ताकद मानला जातो. जर हाच युवकवर्ग व्यसनाच्या आहारी गेला, तर समाज आणि देशाचा विकास गंभीरपणे प्रभावित होतो. पूर्वी काही लोकांमध्ये व्यसनामुळे थकवा दूर होतो किंवा ताण कमी होतो अशी समजूत होती. त्या काळात शिक्षण आणि मनोरंजनाची साधने मर्यादित होती. मात्र आज शिक्षण, तंत्रज्ञान आणि माहितीची अनेक साधने उपलब्ध असूनही अनेक युवक व्यसनाला आधुनिकता, मौजमजा किंवा प्रतिष्ठेचे प्रतीक समजू लागले आहेत. ही प्रवृत्ती अत्यंत चिंताजनक आहे.

कुटुंबातील एखादी व्यक्ती व्यसनाधीन झाली, तर त्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. आर्थिक संकट, मानसिक तणाव, सामाजिक अपमान आणि भावनिक वेदना यांचा सामना करावा लागतो. व्यसन व्यक्तीला हळूहळू जबाबदाऱ्या पासून दूर नेत असते. त्यामुळे तो आपल्या कर्तव्यांचे पालन करण्यात



**-डॉ.प्रीतम भी.गेडाम**
**मोबाईल**
**८२३७४ १७०४१**

अपयशी ठरतो आणि इतर कुटुंबीय असुरक्षित व हतबल वाटू लागतात. जर कुटुंबप्रमुखच व्यसनाधीन असेल, तर संपूर्ण कुटुंबाचे भविष्य धोक्यात येते. व्यसन ही केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्या नाही, तर राष्ट्रीय विकासालाही अडथळा ठरणारी गंभीर समस्या आहे. यामुळे गुन्हेगारी, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गरिबी आणि सामाजिक अस्थिरता वाढते. ज्या देशांमध्ये अमली पदार्थांचा व्यापार मोठ्या प्रम ाणावर वाढला आहे, तेथे सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठा फटका बसलेला दिसून येतो. त्याम ुळे व्यसनाविरोधातील लढा हा केवळ आरोग्याचा विषय नसून सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारीही आहे.

मुलांना आणि किशोरवयीन मुलांना व्यसनापासून दूर ठेवण्यात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. केवळ त्यांच्या इच्छा पूर्ण करणे किंवा भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे पुरेसे नसते. मुलांचा सहवास कोणासोबत आहे, ते कुठे वेळ घालवतात आणि कोणत्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात याची माहिती पालकांना असणे आवश्यक आहे. मुलांच्या वर्तनातील बदल समजून घेऊन योग्य वेळी मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. घरातील वातावरण असे असावे की मुलांना कोणतीही भीती न बाळगता आपले विचार आणि समस्या मांडता याव्यात. पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांच्याशी संवाद साधला, तर त्यांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखता येते. मुलांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्यात कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे त्यांना चांगले संस्कार, नैतिक मूल्ये आणि जीवनदृष्टी देणे आवश्यक आहे.

आज समाजात अनेक अशा घटना घडताना दिसतात, जिथे व्यसनाच्या प्रभावाखाली लोक गंभीर गुन्हे करतात. अशा घटना व्यसनामुळे व्यक्तीची निर्णयक्षमता किती कमी होते याचे स्पष्ट उदाहरण आहेत. त्यामुळे केवळ गुन्हेगाराला दोष देणे पुरेसे नसून, अशा घटना घडण्यामागील सामाजिक परिस्थिती आणि दुर्लक्ष यांचाही विचार करणे आवश्यक आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात व्यसनाची सुरुवात होण्याचे सरासरी वय १२ ते १३ वर्षे आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. कोट्यवधी लोक मद्य, गांजा, चरस, ओपिओइड्स आणि इतर अमली पदार्थांचे सेवन करत आहेत. जागतिक स्तरावरही अमली पदार्थांच्या वापरात सातत्याने वाढ होत आहे. अवैध अमली पदार्थांचे उत्पादन आणि तस्करी संघटित गुन्हेगारीला प्रोत्साहन देत असून अनेक देशांसाठी गंभीर आव्हान ठरत आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी कठोर कायद्यांसोबतच प्रभावी उपचार आणि पुनर्वसन व्यवस्थेचीही गरज आहे. व्यसनाधीन व्यक्तींना वैद्यकीय उपचार, पुनर्वसन आणि भावनिक आधार मिळणे आवश्यक आहे. तणाव, एकाकीपणा, चिंता, सामाजिक दबाव आणि भावनिक अस्थिरता यांसारखी कारणे युवकांना व्यसनाकडे ढकलतात. त्यामुळे त्यांना सकारात्मक जीवनमूल्ये, निरोगी जीवनशैली, आत्मविश्वास आणि मानसिक बळ यांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. देशभरात व्यसनम ुक्ती केंद्रे, पुनर्वसन केंद्रे आणि विविध सहाय्य सेवा उपलब्ध आहेत. 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत १४४४६ हा हेल्पलाइन क्रमांक देखील सुरू करण्यात आला आहे. गरजू व्यक्तींना येथे मदत मिळू शकते.

मानवी जीवन अत्यंत मौल्यवान आहे. ते व्यसनासारख्या विनाशकारी सवयींमध्ये वाया घालवू नये. आपण स्वतः जागरूक राहून इतरांनाही जागरूक केले, तर व्यसनमुक्त समाज आणि निरोगी राष्ट्र उभारण्यात महत्त्वाचे योगदान देऊ शकतो. व्यसन जीवनात सुख, यश किंवा सन्मान आणत नाही. उलट ते व्यक्ती, कुटुंब आणि समाजाला हळूहळू विनाशाच्या दिशेने घेऊन जाते. म्हणूनच आपण सर्वांनी स्वतः व्यसनापासून दूर राहण्याचा आणि इतरांनाही त्यापासून वाचविण्याचा निर्धार केला पाहिजे. हाच निरोगी, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठीचा सर्वांत भक्कम पाया आहे.

# पत्रकारितेवरचा 'हल्ला'

विधानसभा, लोकसभा ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत त्याच बरोबर ते सभागृह कायदेमंडळ देखील आहे. याच कायदेमंडळात कायदे, नियम बनतात, त्यानुसार राज्यकारभार चालतो, घटनेच्या चौकटीत राहून कायद्याचे पालन व्हावे ही सर्वांकडुन अपेक्षा.

आमदार खासदार मंत्री यांच्याकडुन तर ती अधिक आहे. मात्र दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आणि यात बसणाऱ्यांमधे गुंड प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा दिवसेंदिवस वाढत चालला आहे त्यामुळेच लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत, चरित्र कि राजनिती कोणालाच नको आहे. या कायदेमंडळात बसणारेच गुन्हेगाराची, सडक छाप गुंडाची भाषा बोलत आहेत आणि त्याची परिणती समाजजीवनावर विपरित परिणाम करत आहे. नुकतेच मुंबईतील एका खासदाराने पक्षांतर केले या संबधी प्रश्न विचारायला गेलेल्या पत्रकारांना या महाभागाने अर्वाच्य भाषेत धमकी दिली, अगदी पोलिस कमिशनरला सांग असे म्हणत आपल्या कुटुंबाचा कुईतिहास सांगितला. आपण सत्ताधारी पक्षात आलो यामुळे कदाचित त्यांना सत्तेची मस्ती आणि मग्रुरी आली असावी आणि आपण काहीही बोललो तरी आपला पक्ष, सत्ताधारी आघाडी, शासन-प्रशासन आपल्या विरोधात काही कारवाई करणार नाही हा आत्मविश्वास त्यांना असावा म्हणून त्यांनी इतक्या मग्रुरीची भाषा केली आणि हा त्यांचा विश्वास खरा देखील आहे कारण गेल्या काही वर्षांपासून देशात काय किंवा राज्यात काय सत्ताधारी किंवा सत्ताधारी पक्षाशी संबंधित यांच्यासाठी एक न्याय आणि विरोधकांसाठी दुसरा न्याय अशा दुजाभाव अनेकदा अधोरेखित होत आहे. यंत्रणा देखील सत्ताधारी पक्षाची मर्जी राखुन काम करतात यात आता कुठलीच शंका ऊरलीच नाही.

याचमुळे अगदी मंत्रीपदावर राहुन देखील नितेश राणे हे कितीही विद्वेषाची भाषा करत असले किंवा महायुतीतील संजय गायकवाड, संजय बांगर, गोपीचंद पडळकर यांच्या सारख्यांनी कितीही वाचाळपणा केला तरी त्यांना लगाम घातला जात नाही कि कायदेशीर कारवाई केली जात नाही.सत्ताधारी पक्षाचा असला की काहीही बरळता येतो, कुठल्याही पातळीवर जाऊन कुणालाही धमकावता येते, यंत्रणांच्या कारवायांची भिती नसते, वरिष्ठांकडुन अभयदान मिळण्याचा विश्वास असतो म्हणून संजय पाटील यांच्या सारखे पत्रकारांना ऊघणपणे धमकावु शकतात, कोणतीही भाषा वापरु शकतात आणि हे वारंवार घडत आहे. तुम्ही तुमच्या स्वार्थासाठी राजकिय भुमिका घेतात, आर्थिक लाभ मिळवतात मात्र जनता, पत्रकारांनी प्रश्न विचारले की ते तुम्हाला रूचत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी काय याचे भान लोकप्रतिनिधींनी ठेवायला हवे कारण जनता त्यांचे अनुकरण करते,




लोकप्रतिनिधी हे समाजाला दिशा देतात त्यांचीच दिशा चुकली तर देश किंवा समाज कसा घडणार?

लोकप्रतिनिधी हे ज्या प्रमाणे जनतेसाठी काम करतात लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ आहे त्याचप्रमाणे पत्रकारिता हा देखील लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि जनतेचा आवाज शासन प्रशासन, सरकार, लोकप्रतिनिधी यांच्या पर्यंत पोहचविण्याची जबाबदारी माध्यम ांची आहे, समाजाचा जागल्याच्या भुमि केतुन पत्रकार हे आपले कर्तव्य पार पाडत असतात अशावेळी ते प्रश्न विचारणारच आणि त्याची समाधानकारक उत्तरे देणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. खालची पातळी गाठुन बोलणारे संजय पाटील हे केवळ एकच आहे असे नाही तर जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षांत अशी गावगुंडाची भाषा करणारे अनेक 'संजय 'आहेत. ऊशिराचे शहाणपण सुचले म्हणून अखेर खा. संजय पाटील यांनी माफी मागितली हेही नसे थोडके. मात्र तुमच्या राजकीय भांडणाचा राग पत्रकारांवर काढणे कितपत योग्य आहे?. दुर्दैवाने सत्ताधारी किंवा विरोधक हे कुणालाही आवर घालतांना दिसत नाही. आपला माणुस म्हणुन पाठिशी घातले जाते, शासन-प्रशासन देखील काही कारवाई करत नाही त्यामुळेच असे वाचाळविर सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये करतात ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली.ज्या प्रमाणे सर्वच श्वेत्राचे राजकियीकरण झाले आहे तसेच पत्रकारिता श्वेत्राचे देखील काही प्रमाणात राजकियीकरण झाले आहे, अनेक पत्रकार हे राजकीय पक्षांचे प्रवक्ते बनले आहेत, राजकिय भुमिकेतुन पत्रकारिता करत आहे, हे देखील कटु वास्तव आहे. असे असले तरी पत्रकारांना मारहाण होणे, प्रसंगी हत्या होणे, अपमानास्पद भाषा वापरली जाणे याचे समर्थन होऊ शकत नाही. सरकारने पत्रकार संरक्षण कायदा बनवला मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी कुठेच होतांना दिसत नाही.कायदेमंडळात बसणारे अशी भाषा पत्रकारांच्या बाबत करू लागले तर सामान्य जनतेचे काय? आजच्या घडीला लोकशाहीच्या संसद, कार्यपालिका,, न्यायव्यवस्था, आणि प्रिंट तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया हे चारही स्तंभ डळमळीत झाले आहेत, हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आणि नुकसानकारकच आहे ही अधिक चिंतेची बाब आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# ड्रंक अँड ड्राईव्हचा थरार... एका कुटुंबाचा वाचलेला संसार...

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.२६, कराड (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता. कराड गावच्या हद्दीतून जाणाऱ्या पाटण-पंढरपूर राज्य मार्गावर बुधवार दि. २४ जून रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या दरम्यान घडलेली एक घटना समाजातील संवेदनशीलता, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या एका व्यक्तीचा ताबा सुटून तो रस्त्याच्या कडेला कोसळला आणि त्यानंतर जे काही घडले ते आजच्या समाजाचे वास्तव दाखवणारे होते.फोटोमध्ये दिसणारी परिस्थिती अंगावर काटा आणणारी आहे. रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती पडलेली आहे, बाजूला त्याची दुचाकी उभी आहे आणि आजूबाजूला निर्मनुष्य वातावरण दिसत आहे. ही केवळ एका व्यक्तीच्या अपघाताची घटना नाही, तर दारूच्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि कौटुंबिक संकटाचे जिवंत चित्र आहे.




**दारूच्या नशेत हरवलेले भान**

मिळालेल्या माहितीनुसार संबंधित व्यक्तीने मद्यपान केले होते. नशेच्या भरात दुचाकी चालवित असताना वाहनावरील नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याच्या कडेला जाऊन कोसळला. सुरुवातीला अनेक जण घटनास्थळी जमा झाले. नेहमीप्रमाणे चौकशी झाली, चर्चा झाली, काहींनी अंदाज बांधले. मात्र तो दारूच्या नशेत असल्याचे लक्षात येताच अनेकांनी तिथून काढता पाय घेतला.

ही बाब अत्यंत गंभीर आहे. एखादा व्यक्ती चूक करत असेल, त्याच्या वर्तनाशी आपण सहमत नसू शकतो, परंतु तो संकटात असताना त्याला मदतीचा हात देणे हे माणुसकीचे कर्तव्य आहे. दुर्दैवाने आज अनेक ठिकाणी अपघातग्रस्त व्यक्तीकडे बघ्यांची गर्दी होते, पण मदतीसाठी पुढे येणारे हात फारच कमी असतात.

**वेदनांनी विव्हळणारा माणूस आणि हरवलेली संवेदना...**

सदर व्यक्ती बराच वेळ रस्त्याच्या कडेला पडून होता. वेदनांनी विव्हळत होता. त्याच्या जवळ कोणीही उभे नव्हते. दारू प्यायलेला असल्यामुळे अनेकांनी त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवण्याऐवजी दुर्लक्ष करणे पसंत केले.

पण प्रश्न असा आहे की, एखादा माणूस दारू पितो म्हणून त्याचा जीव कमी महत्त्वाचा ठरतो का? त्याच्या कुटुंबाचे काय? त्याच्या पत्नीचे काय? त्याच्या मुलांचे काय? त्याची वाट पाहणाऱ्या घरच्यांचे काय?

**सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण...**

घटनेची माहिती मिळताच आपण घटनास्थळी धाव घेतली. संबंधित व्यक्तीची विचारपूस केली. त्याची परिस्थिती लक्षात घेऊन तात्काळ पोलीस पाटील जयसिंग येळवे तसेच उंब्रज पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या गावातील आणि कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला.जोपर्यंत हा व्यक्ती सुरक्षितपणे त्याच्या कुटुंबाच्या ताब्यात जात नाही, तोपर्यंत घटनास्थळ सोडायचे नाही असा निर्धार करण्यात आला. अखेर त्याचे नातेवाईक घटनास्थळी आले आणि त्याला सुरक्षितपणे घरी घेऊन गेले.

**ही घटना केवळ मदतकार्य नव्हती, तर सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण होते...**

एका पत्नीचे कुंकू आणि मुलांचा बाप वाचला अनेक वेळा अपघातांमध्ये काही मिनिटांचा विलंबही जीवावर बेतू शकतो. योग्य वेळी मदत मिळाली नसती तर या घटनेचे परिणाम गंभीर होऊ शकले असते.त्या व्यक्तीने चूक केली होती. दारू पिऊन वाहन चालविणे हा गुन्हा आहे. परंतु त्याच्या चुकीची शिक्षा त्याच्या पत्नीला का मिळावी? त्याच्या लहान मुलांना वडिलांच्या छत्रछायेशिवाय का राहावे लागावे?त्यामुळे त्या क्षणी मदत करताना समोर एक दारू पिलेला माणूस नव्हता, तर एका कुटुंबाचा आधारस्तंभ दिसत होता. एका पत्नीचे कुंकू, मुलांचा बाप आणि एका कुटुंबाचा संसार सुरक्षित ठेवण्याची भावना होती.

**ड्रंक अँड ड्राईव्ह : एक सामाजिक अभिशाप...**

दारू पिऊन वाहन चालविणे ही केवळ वैयक्तिक चूक नसून समाजासाठी धोकादायक बाब आहे. अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अनेक निष्पाप लोकांचे जीव जातात, कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि अनेकांना आयुष्यभर अपंगत्व भोगावे लागते. म्हणून प्रत्येक नागरिकाने दारू पिऊन वाहन चालवणार नाही आणि दुसऱ्यालाही चालवू देणार नाही असा निर्धार करण्याची गरज आहे.

# थोडक्यात

## मागणी नसतानाही २४ हजार लिटर रॉकेलचा पुरवठा

### २ महिन्यानंतर श्रीरामपूर, जामखेडसाठी सरकारकडून रॉकेल उपलब्ध

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संभाव्य इंधन टंचाईचा सामना करण्यासाठी सरकारने दोन महिन्यांपूर्वी रेशनवर पुन्हा रॉकेल (घासलेट) उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २ लाख १६ हजार लीटर रॉकेलचा कोटा मंजूर करण्यात आला आहे. २ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आता श्रीरामपूर आणि जामखेड तालुक्यासाठी प्रत्येकी १२ हजार लीटर याप्रमाणे २४ हजार लीटर रॉकेलचा पुरवठा झाला आहे. मात्र, सध्या कोणाकडेही मागणी नसताना सरकारने पाठवलेले हे रॉकेल विकत कोण घेणार? असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

देशात एलपीजी गॅसचा वापर वाढल्यानंतर महाराष्ट्रात रेशनवरील रॉकेलचे वितरण टप्प्याटप्प्याने पूर्णपणे बंद करण्यात आले होते. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील नागरिकांना रेशनवर रॉकेल मिळत नव्हते. मात्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि इंधन पुरवठ्यावरील संभाव्य ताण लक्षात घेऊन सरकारने एप्रिल महिन्यात पुन्हा रॉकेल पुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयापूर्वी, जिल्ह्यात रॉकेलवर चालणारे स्टोव्ह उपलब्ध आहेत का, तसेच नागरिकांकडे स्टोव्ह नसल्यास तालुकानिहाय बाजारपेठेत स्टोव्ह विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याची माहिती प्रशासनाकडून घेण्यात आली होती.

प्रत्यक्षात बाजारात अथवा नागरिकांकडे स्टोव्ह उपलब्ध नसतानाही सरकारने जिल्ह्यासाठी हा रॉकेलचा कोटा रवाना केला आहे. जिल्ह्यासाठी एकूण २ लाख १६ हजार लीटर रॉकेलचा कोटा मंजूर झाला आहे. ६२ रुपये ७५ पैसे प्रतिलीटर या दराने प्रत्येक रेशनकार्ड कुटुंबाला ३ लीटर रॉकेल वितरीत करण्यात येणार आहे. सध्या श्रीरामपूर आणि जामखेड तालुक्याला मिळालेले २४ हजार लीटर रॉकेल प्रायोगिक तत्त्वावर दिले जाईल.

## 'एक झाड, एक श्वास' संकल्पाने खांबेवाडीत वृक्षारोपण



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२६, पंढरपूर :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खांबेवाडी, ता. करमाळा येथे 'एक झाड, एक श्वास, एक संकल्प पर्यावरणाचा सन्मान' या घोषवाक्याखाली भव्य वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मनसे तालुकाध्यक्ष संजय (बापू) घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली व मनसे ता.उपाध्यक्ष पै.अशोक गोफने यांच्या वतीने हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा न देता निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरला. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी खांबेवाडी ग्रामपंचायत उपसरपंच आदिनाथ शिंदे, सदस्य दादासाहेब वायकुळे, पोलीस पाटील अनिल देवकते हे आवर्जून उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते सुशील नरोटे, अमोल वायकुळे, बालाजी गरड, अजय माने, मुन्ना टकले, विकी टकले, विशाल नरोटे यांनी ही सहभाग नोंदवला. अंगणवाडी सेविका बानुबाई मोठे, स्वाती गोरे, माधुरी नरोटे यांच्यासह जि.प. प्रा.शाळा खांबेवाडीचे विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने वृक्षारोपणात सहभागी झाले होते. लहान मुलांच्या हातून झाडे लावून पर्यावरण रक्षणाचे धडे देण्यात आले. खांबेवाडी ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित हा कार्यक्रम 'अतिशय आनंद उत्सवात' पार पडला. प्रत्येक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. राज साहेबांच्या विचारांचा वारसा जपत पर्यावरण रक्षणासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी भावना मनसे पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# 'नशामुक्त महाराष्ट्र' करण्यासाठी समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक - पो. उपनि. शिद

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२६, मंडणगड (रत्नागिरी) :** येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व मंडणगड पोलिस स्टेशन यांच्या सहकार्याने 'नशामुक्त महाराष्ट्र - सुरक्षित महाराष्ट्र' या जनजागृतीपर कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मंडणगड पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षक एन. डी. शिद उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर होते. यावेळी मंडणगड पोलिस ठाण्याचे पोलिस विनय पाटील, विशाल कोळथरकर, उपप्राचार्य डॉ.विष्णू जायभाये, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप निर्वाण, डॉ. महेश कुलकर्णी, प्रा.अशोक कंठाळे, प्रा.महादेव वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रभारी प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर यांच्या हस्ते प्रमुख मार्गदर्शक पोलीस उपनिरिक्षक एन. डी. शिद तसेच उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी प्रा. अशोक कंठाळे यांनी प्रास्तावना करताना नशामुक्त महाराष्ट्र बाबत थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर पोलिस विनय पाटील यांनी नशामुक्त महाराष्ट्र - सुरक्षित महाराष्ट करावयाचा असेल तर आपण विद्यार्थी म्हणून कार्य करावे लागले याची थोडक्यात माहिती दिली.



प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना मंडणगड पोलीस उपनिरिक्षक श्री. एन. डी. शिद म्हणाले की, नशामुक्त महाराष्ट्र व सुरक्षित महाराष्ट्र करण्यासाठी आज समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. या अमली पदार्थाच्या व्यसनाधिनतेमुळे माणसाची कशी दुरवस्था होते याची माहिती सांगताना व्यसन करणे सोपे आहे परंतु ते सोडणे अतिशय कठीण आहे. समाजामध्ये अमली पदार्थांचे व्यसन रोखणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. अनेकजन अमली पदार्थ व्यसनाच्या आहारी जाऊन नाहक स्वतःचे अमुल्य जीवन उद्धवस्त करतात, म्हणून विद्यार्थ्यांनी या अंमली पदार्थाच्या व्यसनापासून चार हात दूर रहावे असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांनी महाराष्ट्र शासनाव्दारे अंमली पदार्थांचे सेवन आणि व्यसनाधीनता रोखण्यासाठी सुरु केलेले एक व्यापक जानजागृती अभियान असून, आजच्या धकाधकीच्या जीवनात युवकांमध्ये व्यसनधिनतेचे प्रमाण वाढत असल्याची बाब चिंताजनक आहे. अशा वेळी त्यांना योग्य मार्गदर्शन करुन अमली पदार्थाच्या आहारी जाऊ नये. यासाठी विद्यार्थी व समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी एन.एस.एस. स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक कंठाळे यांनी तर आभार प्रा. डॉ. महेश कुलकर्णी यांनी मानले.

## बाटली, कॅनमध्ये इंधन देण्यास नकार; ग्राहकांकडून पेट्रोल पंपाविरोधात कारवाईची मागणी



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** तालुक्यातील एका एचपी पेट्रोल पंपावरील ग्राहक सेवेबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. बाटली अथवा कॅनमध्ये पेट्रोल व डिझेल देण्यास नकार, मशीनवरील रकमेचा मीटर स्पष्ट दिसणार नाही अशी व्यवस्था, तसेच मोठ्या आवाजात गाणी लावल्यामुळे ग्राहकांना इंधनाची रक्कम व प्रमाण स्पष्ट ऐकू येत नसल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांकडे बाटलीमध्ये पेट्रोल व कॅनमध्ये डिझेल मिळते का, अशी विचारणा केली असता सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असल्याने बाटली किंवा कॅनमध्ये इंधन देता येत नाही, असे उत्तर देण्यात आले. मात्र, ट्रॅक्टरसाठी कॅनमध्ये डिझेल दिले जात असल्याचे फोटो दाखवल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने ट्रॅक्टरवाल्यांना देतो, असे सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे.याशिवाय, इंधन भरण्याच्या मशीनवर प्लास्टिकचे कव्हर टाकल्यामुळे मीटरवरील आकडे स्पष्ट दिसत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तसेच, पेट्रोल पंपावर मोठ्या आवाजात गाणी वाजवली जात असल्याने ग्राहकांनी सांगितलेली रक्कम कर्मचाऱ्यांना नीट ऐकू येत नाही. त्यामुळे मागितलेल्या रकमेपेक्षा जास्त किंवा कमी इंधन भरले जात असल्याचा संशय ग्राहकांनी व्यक्त केला आहे.संबंधित कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा ही आरोप करण्यात आला असून, या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून संबंधित पेट्रोल पंपावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्राहकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# वेताळवाडी शिवारात सोयगाव पोलिसांचा मोठा छापा;

## ५७ हजारांच्या गांजासह दोघांना रंगेहाथ पकडले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, सोयगाव :** दुचाकीवरून हळदा मार्गाने सोयगाव शहरात विक्रीच्या उद्देशाने येत असलेल्या दोन आंतर-तालुका गांजा तस्करांना सोयगाव पोलिसांनी वेताळवाडी शिवारात रंगेहाथ अटक केली आहे. ही धडाकेबाज कारवाई २५ जून २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास वेताळवाडी शिवारातील डोंगराच्या पायथ्याशी करण्यात आली. नव्याने रुजू झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात पोलिसांनी डोंगराच्या आडोशाला दबा धरून बसत हा सापळा यशस्वी केला. या कारवाईत आरोपींकडून १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा गांजा आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सोयगाव पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**डोंगरपायथ्याशी फिल्मी स्टाईल सापळा**

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सोयगाव पोलिसांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून अत्यंत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथून सोयगावकडे मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांची खेप घेऊन काही जण दुचाकीने



येत आहेत. या माहितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने वेताळवाडी शिवारातील डोंगरपायथ्याशी असलेल्या हळदा मार्गावर मोर्चेबांधणी केली. पोलिसांच्या विशेष पथकाने परिसरातील भौगोलिक परिस्थितीचा अंदाज घेऊन डोंगराच्या आडोशाला दबा धरला. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास संशयित दुचाकी वेताळवाडी शिवारात येताच पोलिसांनी त्यांना चहूबाजूने वेढून अत्यंत गुप्तता पाळत रंगेहाथ पकडले.

**आरोपींची ओळख आणि जप्त मुद्देमाल**

अटक करण्यात आलेल्या संशयितांची पोलिसांनी सखोल चौकशी केली असता, त्यांची नावे अजगर अली अन्सार अली शहा (वय ४३ वर्षे, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड) आणि पांडुरंग पुंडलिक केळोदे (वय ६५ वर्षे, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड) अशी असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे तब्बल १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा ओला-सुका गांजा आढळून आला. आंतरराष्ट्रीय व स्थानिक बाजारपेठेतील मूल्यांकनानुसार या गांजाची किंमत सुमारे ५७ हजार रुपये इतकी आहे. याशिवाय तस्करीसाठी वापरण्यात आलेली ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल (दुचाकी) देखील पोलिसांनी जप्त केली आहे. एकूण १ लाख ७ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दोन्ही आरोपींना पोलीस ठाण्यात आणून रीतसर अटक करण्यात आली.

**फॉरेन्सिक लॅबचे पथक घटनास्थळी दाखल**

अमली पदार्थांची तस्करी आणि व्यावसायिक विक्रीचा हा गंभीर गुन्हा असल्याने, घटनेची अधिकृत कायदेशीर पडताळणी करण्यासाठी रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगर येथील फॉरेन्सिक लॅबच्या (न्यायालयीन वैज्ञानिक प्रयोगशाळा) विशेष पथकाला पाचारण करण्यात आले होते.

फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी धाव घेऊन जप्त केलेल्या अमली पदार्थांचे रासायनिक नमुने गोळा केले आणि कायदेशीर पंचनामा पूर्ण केला. हा पंचनामा न्यायालयात सबळ पुरावा म्हणून सादर केला जाणार असून, यामुळे गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.